रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३२४
www.ramprahar.com
◆ शुक्रवार, १२ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

वारली कलेने खुलला कशेडी बोगदा/२
अंगणवाडीची तोडफोड; दोन जणांवर गुन्हा/५
आजपासून महिला टी-२०चा महाकुंभ/८

## अमेरिकन नौदलाच्या हल्ल्याचा भारताकडून निषेध



**नवी दिल्ली** : ओमानच्या खाडीत एका व्यावसायिक मालवाहू जहाजावर अमेरिकेने केलेल्या भीषण हल्ल्यात तीन भारतीय नाविकांचा मृत्यू झाला आहे. केंद्रीय नौकानयनमंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी गुरुवारी (दि.११) या दुर्दैवी घटनेची पुष्टी केली. या घटनेनंतर भारताने अमेरिकेच्या राजदूतांना बोलावून कडक शब्दांत निषेध नोंदवला असून नवी दिल्लीतील अमेरिकेच्या 'चार्ज डी'अफेअर्स' अर्थात प्रभारी राजदूतांना समन्स बजावले आहे. पत्रकार परिषदेला संबोधित करताना परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी पश्चिम आशियातील समुद्र प्रदेशात व्यापारी जहाजांवर सततचे हल्ले होत असल्याचा विषय अत्यंत चिंताजनक आहे व ते थांबलेच पाहिजेत, असे सांगितले. दरम्यान, या हल्ल्यातून २१ भारतीय कर्मचाऱ्यांना सुखरूप वाचवण्यात यश आले असून त्यांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले आहे.

# हरित इंधन मोहिमेला कर दिलासा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्र सरकारने २२ ते ३० टक्के इथेनॉल मिश्रण असलेल्या पेट्रोलला उत्पादन शुल्कातून पूर्णपणे सूट दिली आहे. सध्याच्या ई-२० इंधनाच्या मर्यादेपलीकडे जाऊन कर सवलत देणारा हा एक मोठा निर्णय आहे. देशात इथेनॉलचा वापर वाढवणे आणि आयातीवरील कच्च्या तेलावरील अवलंबित्व कमी करणे हा या निर्णयाचा मुख्य उद्देश आहे.

पर्यायी इंधनाचा वापर वाढवण्यासाठी आणि कच्च्या तेलाची आयात कमी करण्यासाठी सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे देशातील हरित इंधन मोहिमेला मोठा कर दिलासा मिळाला आहे. जारी करण्यात आलेल्या सरकारी अधिसूचनेनुसार पेट्रोलमध्ये २२ ते ३० टक्के इथेनॉलचे मिश्रण असेल, त्यावर आता कोणतेही उत्पादन शुल्क आकारले जाणार नाही.



### इथेनॉलमिश्रित पेट्रोलवरील उत्पादन शुल्क रद्द

भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा तेल आयातदार आणि ग्राहक देश आहे. देशाच्या ऊर्जा सुरक्षा धोरणाचा एक भाग म्हणून पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण वाढवण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे.

मध्य पूर्वेतील इराण-अमेरिका संघर्ष सुरू झाल्यापासून देशात पेट्रोल आणि डिझेलच्या दरांमध्ये वाढ करावी लागली आहे आणि याच पार्श्वभूमीवर हे पाऊल उचलण्यात आले आहे. या निर्णयामुळे तेल कंपन्यांपासून ते सामान्य शेतकरी आणि ग्राहकांपर्यंत सर्वांनाच फायदा होईल.

### इथेनॉल पेट्रोल पंपांचे जाळे विस्तारणार

मिश्रित पेट्रोलवरील उत्पादन शुल्कात सवलत देणे हा इथेनॉलचा वापर वाढवण्याच्या सरकारच्या प्रयत्नांचाच एक भाग आहे. या अंतर्गत दिल्ली-एनसीआर, पुणे, मुंबई आणि नागपूर येथे ५० ते १०० इथेनॉल पेट्रोल पंप सुरू करण्याची आणि २०२६ अखेरपर्यंत हे जाळे ५०० केंद्रांपर्यंत विस्तारण्याची योजना आहे.

**एसटी कर्मचाऱ्यांसाठी खूशखबर!**

## महागाई भत्ता ५८ टक्क्यांवर; घरभाडे भत्ताही वाढवण्याचा निर्णय

**ठाणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सुमारे ८६ हजार कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोठा दिलासादायक निर्णय घेत परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे ५३ टक्क्यांवरून ५८ टक्क्यांपर्यंत वाढविण्याची घोषणा केली. यासोबतच कर्मचाऱ्यांच्या घरभाडे भत्त्यातदेखील वाढ करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

मुंबई सेंट्रल येथील 'वाहतूक भवन' या महामंडळाच्या मुख्यालयात गुरुवारी (दि.११) राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत आयोजित करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत ही घोषणा करण्यात आली. यावेळी विविध कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी मांडलेल्या आर्थिक व प्रशासकीय मागण्यांवर सकारात्मक आणि सविस्तर चर्चा झाली.

बैठकीच्या प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरध्वनीद्वारे सर्व कर्मचारी संघटनांना शुभेच्छा देताना सामंजस्याची भूमिका घेऊन महामंडळ अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी एकत्र काम करावे, असे आवाहन केले.



यावेळी मंत्री प्रताप सरनाईक यांनी आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत भविष्यात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता लागू होताच तो तत्काळ प्रभावाने एसटी कर्मचाऱ्यांनाही लागू करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले तसेच वेतनवाढीची थकबाकीही आर्थिक परिस्थितीचा विचार करून टप्प्याटप्प्याने अदा केली जाणार असल्याचे स्पष्ट केले. त्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यासोबत एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनांची बैठक आयोजित करण्यात येईल, असेही सांगितले.

बैठकीत कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, सेवाशर्ती, रिक्त पदभरती, बसस्थानक विकास, कल्याणकारी योजना तसेच महामंडळाच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासंदर्भातील विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही देत मंत्री सरनाईक यांनी प्रशासनाला आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले.

कामगार संघटनांशी सातत्याने संवाद साधून प्रश्न सोडविण्याला प्राधान्य दिले जाईल, असे सांगताना मंत्री सरनाईक म्हणाले, महामंडळाच्या सर्व संघटनांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी असलेली समिती तातडीने स्थापन करण्यात यावी. उत्पन्नवाढीसाठी समितीने सुचविलेल्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी.

या बैठकीस महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी प्रियंका नारनवरे, वरिष्ठ अधिकारी, विविध कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी तसेच राज्यभरातील कामगार प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**पनवेल : श्रेयश शैलेंद्र तांडेल याने पालघर येथील वेदांत मेडिकल कॉलेजमधून आपले एमबीबीएसचे शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून मानाची डॉक्टर पदवी प्राप्त केली आहे. या यशानंतर श्रेयशने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी श्रेयशचे वडील शैलेंद्र तांडेल आणि आई गीता तांडेल उपस्थित होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी श्रेयशचे अभिनंदन करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## राष्ट्रवादीच्या वर्धापनदिनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा


**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७व्या वर्धापन दिनानिमित्त गुरुवारी (दि.११) मुंबईत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास पक्षाचया प्रमुख तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह इतर अनेक महत्त्वाचे नेते उपस्थित होते. हा कार्यक्रम दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृतींना समर्पित करण्यात आला.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार भाषण करायला उभ्या राहिल्या, त्यावेळी त्यांनी सुरुवातीला महापुरुषांना अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी स्व. अजित पवार यांचा उल्लेख केला. अजितदादांचा उल्लेख येताच सुनेत्राताईंना गहिवरून आले. 'आपल्या सर्वांचे लाडके नेते अजितदादा यांना भावपूर्ण आदरांजली वाहते. त्यांना वंदन करते,' असे त्या भावूक होत म्हणाल्या. यावेळी कार्यकर्त्यांनी अजित पवार यांच्या स्मरणार्थ अमर रहे अशा घोषणा दिल्या.



## मान्सूनची वाटचाल मंदावली



### राज्यात उकाड्याचा कहर कायम

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात दाखल झालेल्या नैऋत्य मोसमी वाऱ्यांची (मान्सून) वाटचाल सध्या मंदावली आहे. परिणामी राज्यातील नागरिकांना जून महिन्यातही उकाड्याचा सामना करावा लागत आहे.

हवामान तज्ज्ञांच्या मते गुजरात आणि उत्तर अरबी समुद्रावर सध्या प्रभावी प्रतिचक्रवात (अँटीसायक्लॉन) सक्रिय आहे. ही प्रणाली मान्सूनच्या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने कोरडी हवा खेचून आणत असल्याने मोसमी वाऱ्यांचा वेग कमी झाला आहे. परिणामी पावसाचे ढग तयार होण्यास अडथळा निर्माण होत असून मान्सूनची उत्तर दिशेकडील वाटचाल थांबली आहे.

सध्या अनेक भागांत आकाश ढगाळ दिसत असले तरी पावसासाठी आवश्यक असलेली ढगांची घनता निर्माण होत नसल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. प्रतिचक्रवाताचा प्रभाव कमी झाल्यानंतर मान्सून मुंबई, पुणे आणि राज्यातील इतर भागांकडे वेगाने सरकेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

## भारताची क्रीडा क्षेत्रातील घोडदौड थक्क करणारी -पंतप्रधान नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय खेळाडूंची जागतिक स्तरावरील कामगिरी आणि देशातील क्रीडा संस्कृतीचा वाढता विस्तार यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. नवी दिल्ली येथे आयोजित एनडीए परिषदेत बोलताना पंतप्रधानांनी भारताला क्रीडा विश्वातील एक जागतिक महाशक्ती म्हणून प्रस्थापित करण्याच्या स्वप्नाचा पुनरूच्चार केला.

पंतप्रधान मोदींनी आपल्या भाषणात भारतातील युवा खेळाडूंच्या सातत्यपूर्ण कामगिरीवर विशेष प्रकाश टाकला. ते म्हणाले की, आजचा भारतीय तरुण केवळ खेळत नाही, तर तो जिंकण्याची जिद्द घेऊन मैदानात उतरत आहे. भारतीय क्रीडा क्षेत्राची वाढ आज थक्क करणारी आहे. भारत आता केवळ खेळाडू घडवणारा देश उरला नसून जगातील सर्वांत मोठ्या क्रीडा लीगचे मुख्य केंद्र म्हणून वेगाने उदयास येत आहे. सरकारने क्रीडा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या सुधारणांचीही आठवण पंतप्रधानांनी करून दिली.

### ऑलिम्पिकसाठी मोठी स्वप्ने पाहा!

यावेळी पंतप्रधान मोदींनी केवळ सध्याच्या कामगिरीवर समाधान न मानता पुढील ऑलिम्पिकसाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी ध्येय निश्चित करण्याचे आवाहन देशवासीयांना केले. पंतप्रधान म्हणाले, ऑलिम्पिकसाठीची आपली तयारी ही केवळ खेळाची तयारी नसून ती न्यू इंडियाच्या आकांक्षांचे प्रतिबिंब आहे. खेळाडू आणि क्रीडा क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी अथक प्रयत्न करावेत, असा कानमंत्र त्यांनी दिला.

## श्रीरामाच्या जयघोषात सिंहस्थ कुंभमेळा ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन सोहळा

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन सोहळ्याने शुभारंभ झाला आहे.

आगामी कुंभमेळा स्वच्छ, सुरक्षित व भव्य स्वरूपात होण्यासाठी शासन, प्रशासन, साधूसंत, महंत, विविध सामाजिक, धार्मिक संघटना आणि नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांचे आदरातिथ्य करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांनी केले.



श्री गंगा गोदावरी पंचकोठी (तीर्थ) पुरोहित संघ नाशिकच्या वतीने सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर श्रीरामाच्या जयघोषात आणि वेद मंत्रोच्चारात ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन सोहळा गुरुवारी (दि.११) सकाळी कमला एकादशीच्या पर्वावर पवित्र रामकुंड येथे कुंभमेळामंत्री महाजन यांच्या उपस्थितीत झाला. सोहळ्यास आमदार सीमा हिरे, महापौर हिमगौरी आडके-आहेर, उपमहापौर विलास शिंदे, नरेंद्राचार्य महाराज, माजी आमदार बाळासाहेब सानप, पुरोहित संघाचे सतीश शुक्ल यांसह विविध आखाड्यांचे प्रमुख साधूसंत, महंत उपस्थित होते.

भावपूर्ण श्रद्धांजली



स्व. कान्हाशेठ हरी ठाकूर
जन्म दि. १ जून १९५२ / मृत्यू दि. ३ जून २०२६

| वार | दिनांक/वेळ | भजन मंडळाचे नाव |
| --- | --- | --- |
| शुक्रवार | १२/०६/२०२६ (सायं. ७ ते ८.३० वा.) | दत्तप्रासादिक भजन मंडळ - आदई बुवा - श्री. गणपत म्हात्रे, पखवाज - चेतन पाटील |
| शनिवार | १३/०६/२०२६ (सायं. ४.३० ते ६ वा.) | ज्ञानाई सांस्कृतिक भजन मंडळ (बेलापूर) गायक - भजनरत्न श्री. महादेव बुवा शहाबाजकर पखवाज - श्री. दर्शन नाईक, तबला - कु. गौरव म्हात्रे |
| | सायं. ७ ते ८.३० वा. | नादब्रम्ह साधना मंडळ - खारघर गुरूवर्य श्री. निवृत्ती बुवा चौधरी, पखवाज - निलेश पाटील |
| रविवार | १४/०६/२०२६ (सायं. ७ ते ८.३० वा.) | हनुमान प्रासादिक भजन मंडळ - पडघे संगीत रत्न श्री. शंकुनाथ बुवा पडघेकर, पखवाज - किशोर पाटील, चालक - पांडुशेठ भोईर |

सोमवार | १५/०६/२०२६

हरि किर्तन



सकाळी -१०:०० ते १२:००
किर्तनकार -ह.भ.प. वैभव बुवा मंडलिक,
पखवाज साथ - श्री. सुधीर भाऊ कराळे,
तबला साथ - श्री. दिगंबर गायकर,
सहगायक -श्री. अनिल यशवंतराव,
श्री हर्षल घुडे,
सिंथेसाईझर - श्री. दर्शन वाघचौडे



❊ किर्तनकार ❊
ह.भ.प.वैभव बुवा मंडलिक

तुका म्हणे पावठणी | करू स्वर्गाची निशाणी ||

शोकाकुल - समस्त ठाकूर परिवार
(न्हावेखाडी)

टिप - कोणत्याही प्रकारचे दुःखवटे स्वीकारले जाणार नाहीत.

नारी शक्तीला वंदन!



३२ + कोटी महिलांची जनधन खाती
३ + कोटी महिला बनल्या 'लखपती दीदी'
₹ १६ + लाख कोटी मुद्रा कर्जाचे महिलांना वितरण; उद्योजकतेला मिळाले बळ
१२ वर्षे विश्वासाची, विकासाची, जन-कल्याणाची
भारत सरकार



एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री
सुनेत्रा अजित पवार उपमुख्यमंत्री
देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री

# संगीत नाटक अकादमीचे पुरस्कार जाहीर

## महाराष्ट्रातील दिग्गज अन् युवा कलावंतांचा राष्ट्रीय गौरव

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संगीत, नृत्य, नाट्य आणि लोककलांच्या जतन व संवर्धनासाठी देशातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या संगीत नाटक अकादमीच्या वतीने वर्ष २०२४ आणि २०२५साठीचे प्रतिष्ठित संगीत नाटक अकादमी फेलोशिप, संगीत नाटक अकादमी पुरस्कार तसेच उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील अनेक ज्येष्ठ, दिग्गज तसेच युवा कलावंतांनी राष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळवत राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा गौरव वाढविला आहे.



वर्ष २०२४साठी जाहीर करण्यात आलेल्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांमध्ये हिंदुस्तानी शास्त्रीय गायन क्षेत्रातील ज्येष्ठ गायक अरुण कशाळकर आणि अभंग गायनासाठी प्रसिद्ध गायक आनंद भाटे यांचा समावेश आहे. अभिनय क्षेत्रातील योगदानासाठी अभिनेते अरुण नलावडे, पारंपरिक रंगभूमी क्षेत्रासाठी मुकुंद मराठे, लोकनृत्य क्षेत्रासाठी सुभाष नारायण नकाशे तसेच नृत्य क्षेत्रातील संशोधन आणि अभ्यासपूर्ण योगदानासाठी शुभदा वरदकर यांची निवड करण्यात आली आहे.उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारांमध्ये हिंदुस्तानी गायनासाठी कृष्ण बोंगाणे आणि अंकिता जोशी, भारूड या लोकसंगीत प्रकारासाठी भावार्थ रामचंद्र देखणे, बाहुलीनाट्य या दुर्मिळ लोककलेसाठी बाळकृष्ण गणपत मसगे आणि लोकनृत्य व लोकसंगीतासाठी चेतन वामन खेडेकर यांची निवड झाली आहे.

वर्ष २०२५साठीच्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांमध्ये सनई वादनासाठी शैलेश भागवत, दिग्दर्शन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी प्रमोद डी. पवार, नाट्यसंगीत क्षेत्रातील दीर्घकालीन योगदानासाठी ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की तसेच कथक नृत्य क्षेत्रातील विशेष कार्यासाठी मनीषा साठे यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारांमध्ये हार्मोनियम वादनातील प्रभुत्वासाठी तन्मय देवचके आणि महाराष्ट्राच्या लोकपरंपरेतील जागर या लोकसंगीत प्रकारासाठी प्रवीण प्रताप जाधव यांची निवड करण्यात आली आहे.

या पुरस्कारांचे स्वरूप अत्यंत प्रतिष्ठेचे असून अकादमी पुरस्काराचे स्वरूप एक लाख रुपये, ताम्रपट आणि शाल असे आहे, तर युवा कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारांतर्गत २५ हजार रुपये, ताम्रपट आणि शाल देऊन सन्मानित केले जाते. हे पुरस्कार राष्ट्रपतींच्या उपस्थितीत आयोजित विशेष समारंभात प्रदान करण्यात येणार असल्याचे अकादमीतर्फे कळविण्यात आले आहे.

# अ‍ॅप-आधारित टॅक्सी कंपन्यांवर मंत्री सरनाईक यांचे कारवाईचे निर्देश

**कल्याण : प्रतिनिधी**

अ‍ॅप-आधारित टॅक्सी आणि राईड-हेलिंग सेवांच्या माध्यमातून प्रवाशांकडून जबरदस्तीने टिप मागणे, अतिरिक्त रकमेची सक्ती करणे तसेच प्रवाशांच्या अडचणीचा गैरफायदा घेत आर्थिक शोषण करण्याच्या प्रकारांविरोधात कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी केलेल्या मागणीची राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तात्काळ दखल घेत संबंधित कंपन्यांवर कारवाई करण्याचे निर्देश परिवहन आयुक्तांना दिले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून विविध अ‍ॅप-आधारित टॅक्सी सेवांबाबत प्रवाशांकडून मोठ्या प्रमाणावर तक्रारी समोर येत होत्या. प्रवास स्वीकारल्यानंतर अतिरिक्त टिप किंवा जादा रकमेची मागणी करणे, ती न मिळाल्यास प्रवास रद्द करणे अथवा प्रवाशांना मानसिक त्रास देणे असे प्रकार वाढल्याने खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली होती.

या मागणीची दखल घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तात्काळ प्रतिक्रिया देत प्रवाशांकडून जबरदस्तीने टिप मागण्याचा प्रकार अन्यायकारक असल्याचे स्पष्ट केले. तसेच संबंधित कंपन्यांच्या कारभाराची चौकशी करून आवश्यक ती कठोर कारवाई करण्याचे निर्देश परिवहन आयुक्तांना देण्यात आल्याचे त्यांनी जाहीर केले. यावेळी परिवहन मंत्री सरनाईक यांनी ही बाब निदर्शनास आणून दिल्याबद्दल खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे आभारही व्यक्त केले. अ‍ॅप-आधारित टॅक्सी



आणि राईड-हेलिंग सेवा देणाऱ्या कंपन्यांचा मनमानी कारभार रोखण्यासाठी परिवहन विभागाकडून महत्त्वपूर्ण उपाययोजना राबविण्यात येणार असून या क्षेत्रासाठी लवकरच नवीन अ‍ॅग्रीगेटर धोरण जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**काय होती मागणी?**

अ‍ॅप-आधारित टॅक्सी आणि राईड-हेलिंग सेवांकडून प्रवाशांवर लादल्या जाणाऱ्या या अन्यायकारक पद्धतीविरोधात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना कठोर कारवाई करण्याचे आवाहन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केले होते. तर गरजेच्या वेळी प्रवाशांना वेठीस धरणे, त्यांची अडचण ओळखून आर्थिक शोषण करणे आणि जादा रक्कम देण्यास भाग पाडणे, हा प्रकार ग्राहकांच्या हक्कांवर गदा आणणारा आहे. ही केवळ चुकीची व्यावसायिक पद्धत नसून ग्राहकांना अक्षरशः ओलीस ठेवण्यासारखी बाब आहे. ग्राहकांकडून स्वेच्छेने मिळणारी टिप ही सेवेच्या गुणवत्तेची पावती असते; मात्र टिप किंवा अतिरिक्त शुल्कासाठी दबाव टाकणे, सेवा नाकारण्याची धमकी देणे किंवा ग्राहकांना मानसिक त्रास देणे स्वीकारार्ह नाही.

# सिडकोच्या सागरी महामार्गावरील नारळाचे वृक्ष पाणी आणि देखभालीअभावी करपले

**उरण : रामप्रहर वृत्त**

वाढत्या प्रचंड उष्म्यामुळे द्रोणागिरी नोड आणि उरणला जोडणाऱ्या सिडकोच्या सागरी महामार्गावरील हजारो नारळी वृक्ष संकटात आले आहेत. यातील अनेक वृक्षांच्या फांद्या उन्हामुळे करपू लागल्या असून अनेक वृक्ष संपूर्णपणे करपून गेले आहेत. सिडकोने जेएनपीटी ते पळस्पे या राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा चार पदरी सागरी महामार्ग तयार केला आहे. समुद्र आणि खाडीलगत असलेल्या या परिसरात नारळाच्या वृक्षांची वाढ होण्यासारखे पोषक वातावरण आहे. नारळाच्या झाडांमुळे या परिसरातील सिडकोला उत्पन्न देणारा आणि त्याचबरोबर महामार्गाची वेगळी ओळख निर्माण करणारा ठरणार आहे.



द्रोणागिरी ते पागोटे या पाच किलोमीटर लांबीच्या सागरी महामार्गावर सिडकोने प्रचंड खर्च करून पहिल्यांदाच अडीच हजारांपेक्षा अधिक नारळाच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले आहे. मात्र या वृक्षांची देखभाल होत नसल्याने हा खर्च वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. एकीकडे या वृक्षांच्या देखभालीसाठी सिडकोच्या द्रोणागिरी नोड विभागाकडून खर्च केला जात आहे. मात्र त्याचा फायदा होताना दिसत नाही.सिडकोच्या सागरी मार्गावर मोठया प्रमाणात नागरिक सकाळी व सायंकाळी चालण्यासाठी येतात.

या महामार्गाच्या दोन्ही मार्गिकांवर ही वृक्ष लागवड करण्यात आली आहे. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून या मार्गावरील नारळी वृक्षांच्या देखभालीकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे विविध कारणांनी वृक्ष नष्ट होऊ लागले आहेत. गवताला लावण्यात येणाऱ्या आगीमुळे तसेच वेळेत पाणी न मिळाल्याने हे वृक्ष नष्ट होत आहेत. सागरी महामार्ग हा भविष्यात प्रवाशांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. हे ओळखूनच सिडकोने लाखो रुपये खर्च करून नारळाच्या वृक्षांच्या लागवडीचा उपक्रम राबविला आहे.

आता याकडे दुर्लक्ष केले जात असल्याबद्दल परिसरातील नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. उरणमधील वाढते प्रदूषण आणि घटती जंगल संपदा यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यात सिडकोने या मार्गाच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या नारळी वृक्षांची जपणूक करावी अशी मागणी पर्यावरणवादी कार्यकर्ते निकेतन ठाकूर यांनी केली.

**वृक्षांचे संरक्षण, संवर्धन करण्याची मागणी**

वृक्षांना वेळेत पाणी न दिल्याने वृक्षांची पाने जळू लागली आहेत. त्यामुळे अनेक वृक्ष नष्ट होऊ लागली आहेत. त्याचप्रमाणे या परिसरात गवताला लावण्यात येणाऱ्या आगीच्या भक्ष्यस्थानी पडत आहेत.

# सुदाम शिंदेंचा सेवापूर्ती व षष्ठ्यब्दीपूर्ती सोहळा

**माणगाव : प्रतिनिधी**

बीएसएनएलमधून तब्बल ३१ वर्षे सहा महिने प्रामाणिक सेवा बजावल्यानंतर सेवानिवृत्त होत असलेल्या तसेच वयाची ६० वर्षे पूर्ण केल्याबद्दल समाजसेवक सुदाम बाबू शिंदे यांचा सेवापूर्ती आणि षष्ठ्यब्दीपूर्ती सोहळा मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात संपन्न झाला.

सुदाम शिंदे यांनी आपल्या जीवनात नोकरी, कुटुंब आणि समाजकारण यांचा सुंदर समतोल साधत कार्य केले. बीएसएनएलमध्ये सेवा बजावत असताना त्यांनी कर्मचारी संघटनेत सदस्य ते महाराष्ट्र राज्य सचिव या पदापर्यंत मजल मारली. तसेच सामाजिक क्षेत्रात जिल्हा सदस्य, महाराष्ट्र राज्य प्रतिनिधी, जिल्हा सचिव ते जिल्हाध्यक्ष अशी विविध पदे भूषविली आहेत.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले, ओबीसी जनमोर्चाचे अध्यक्ष सुरेशजी मगर, महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे उपाध्यक्ष महादेवजी चव्हाण, शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, जिल्हा परिषद सदस्य दिनेश हरवणकर, तसेच विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# प्रभाग समिती ‘ड’मार्फत अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ‘ड’ अंतर्गत तक्का पेट्रोल पंपासमोरील अनधिकृत होर्डिंग हटविण्याची कारवाई आज(दि.१० जून) करण्यात आली. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार महापालिका क्षेत्रातील अनधिकृत जाहिरात फलकांवर प्रभावी कारवाई करण्यात येत आहे.



ही कारवाई अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे तसेच उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या निर्देशानुसार करण्यात आली. सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रूपाली माने यांच्या नेतृत्वाखाली व प्रभाग अधीक्षक राजेश डोंगरे यांच्या देखरेखीखाली ही मोहीम राबविण्यात आली.

या कारवाईसाठी प्रभाग समिती ‘ड’ मधील अतिक्रमण पथक, प्रभाग कार्यालयातील कर्मचारी, रायगड सुरक्षा रक्षक तसेच एमएसएफ सुरक्षा रक्षक यांच्या साह्याने ही कारवाई करण्यात आली. अनधिकृत होर्डिंग हटविण्यासाठी एक मोठी क्रेन व एक हायड्रा यंत्राचा वापर करण्यात आला.

महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत जाहिरात फलक, होर्डिंग्ज व अतिक्रमणांविरोधातील कारवाई यापुढेही नियमितपणे सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी कोणत्याही प्रकारचे अनधिकृत होर्डिंग अथवा जाहिरात फलक उभारू नयेत तसेच महानगरपालिकेच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# मध्य रेल्वे आरपीएफचा उत्कृष्ट तपास : मोबाईल चोरी, अमली पदार्थांची तस्करी उघडकीस

**रोहा : प्रतिनिधी**

मे २०२६मध्ये मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा दलाने सतर्कता, सचोटी आणि कर्तव्यदक्षतेचे प्रदर्शन करत दोन स्वतंत्र मोबाईल चोरीच्या प्रकरणांमध्ये ७ आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणात २२ लाख रुपयांहून अधिक किमतीचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत केले आहे. याच महीन्यात अमली पदार्थांच्या तस्करीचे एक रॅकेट उघडकीस आणून २.५० लाख रुपयांहून अधिक किमतीचे अमली पदार्थ जप्त केले आहे.

**मोबाईल चोरीची प्रकरणे**

२२ मे २०२६ रोजी केरळमधील कन्नूर पोलिसांनी दिलेल्या माहितीच्या आणि छायाचित्रांच्या आधारे, वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त भुसावळ यांच्या मार्गदर्शनाखाली आरपीएफच्या एका विशेष पथकाने नियोजनबद्ध शोध मोहीम राबवली. ही मोहीम 'गाडी क्रमांक १२६१७ एर्नाकुलम-हजरत निजामुद्दीन एक्सप्रेस' भुसावळ स्थानकावर येण्यापूर्वी राबवण्यात आली.

आरपीएफ पथकाने सर्व डब्यांची कसून तपासणी केली. प्रसारित केलेल्या छायाचित्रांशी साधर्म्य असलेले चार संशयित एका सामान्य डब्यात आढळून आल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले. झडतीदरम्यान ३७ मोबाईल फोन व २५,२३५ रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत



अंदाजे १८.२५ लाख रुपये इतकी आहे. चौकशी दरम्यान आरोपींनी कबूल केले की हा मुद्देमाल केरळमधील कन्नूर येथील एका मोबाईल दुकानातून चोरण्यात आला होता.

५ मे २०२६ रोजी मनमाड रेल्वे स्थानकावर गस्त घालत असताना आरपीएफच्या दोन कॉन्स्टेबल्सनी तीन संशयास्पद व्यक्तींना अडवले आणि पडताळणीसाठी त्यांना आरपीएफ पोस्ट मनमाड येथे आणले.झडतीदरम्यान त्यांच्याकडे अंदाजे ४.०८ लाख रुपये किमतीचे २८ चोरीचे मोबाईल फोन सापडले. चौकशीत आरोपींनी कबूल केले की हे मोबाईल फोन कर्नाटक राज्यातील कलबुरगि येथील 'उर्स' जत्रेतून चोरले होते.

**अमली पदार्थांशी संबंधित प्रकरणे**

मध्य रेल्वेच्या 'ऑपरेशन नार्कोस' अंतर्गत रेल्वे सुरक्षा दलाने नागपूर रेल्वे स्थानकावर अंदाजे २.५६ लाख रुपये किमतीचा १२.८० किलो गांजासदृश अमली पदार्थ जप्त केला आणि अमली पदार्थांची तस्करी करण्याचा प्रयत्न हाणून पाडला.

४ मे २०२६ रोजी नागपूर येथील 'क्राइम इंटेलिजन्स ब्रँच'चे अधिकारी नागपूर रेल्वे स्थानकाच्या मुंबई बाजूकडील 'फूट ओव्हर ब्रिज'वर गुन्हे प्रतिबंधक आणि देखरेखीच्या कर्तव्यावर होते. दुपारी ३:१५ च्या सुमारास, प्लॅटफॉर्म क्र. ०८ च्या पायऱ्यांजवळ एक संशयास्पद व्यक्ती काळ्या-निळ्या रंगाची ट्रॉली बॅग आणि निळ्या रंगाची बॅकपॅक घेऊन जाताना दिसली. चौकशी आणि बॅगांची तपासणी सुरू असताना ती व्यक्ती दोन्ही बॅगा तिथेच सोडून घटनास्थळावरून पळून गेली. आरपीएफ कर्मचारी आणि श्वान पथकातील 'प्रिन्स' या श्वानाने केलेल्या तपासणीत ट्रॉली बॅगमधून खाकी टेप गुंडाळलेली १२ पाकिटे सापडली. या पाकिटांमध्ये १२.८० किलो गांजासदृश अमली पदार्थ असल्याचे आढळून आले, ज्याची अंदाजित किंमत २,५६,००० रुपये इतकी होती.

प्रतिबंधित माल जप्त करून पुढील कायदेशीर कारवाईसाठी जीआरपी पोलीस ठाणे, नागपूर यांच्या ताब्यात देण्यात आला. रेल्वेमार्गे होणारी अमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी मध्य रेल्वेच्या आरपीएफने 'ऑपरेशन नार्कोस' अंतर्गत स्थानकांवर आणि गाड्यांमध्ये देखरेख अधिक तीव्र केली आहे.कोणतीही संशयास्पद हालचाल किंवा बेवारस सामान आढळल्यास हेल्पलाइन क्रमांक १३९ वर किंवा जवळच्या आरपीएफ व जीआरपी कर्मचाऱ्यांकडे त्वरित माहिती द्यावी.

# मुंबई-गोवा महामार्गावरील खड्डा सामाजिक कार्यकर्ते रणधीर कनोजे यांनी बुजविला

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथे मुंबई -गोवा महामार्गावर मोर्बा रोड कॉर्नरवर एक भलामोठा खड्डा पडला होता. हा खड्डा येथील अपघातग्रस्थांना सदैव मदत करणारे माजी ग्रामपंचायत सदस्य तथा शिवसेना शिंदे गटाचे माणगाव शहर सचिव रणधीर कनोजे यांनी बुजविल्याने त्यांचे प्रवासी वर्ग,वाहन चालक व नागरिकांकडून या कार्याचे विशेष कौतुक होत आहे.

माणगाव शहरातील मुंबई-गोवा महामार्गावर मोर्बा रोड कॉर्नरवर एक भलामोठा खड्डा पडला होता. हा खड्डा छोटे-मोठे वाहन चालक-मालक यांना त्रासदायक ठरत होता. या खड्ड्यात वाहने आपटून अपघात होऊन वाहनांचे नुकसान होत असे. या प्रश्नाकडे गेली अनेक महिने कोणी लक्ष दिले नाही.

युवानेते कनोजे यांनी जातीने लक्ष



घालून दि. ५ जून रोजी सिमेंट,रेती आणून तो खड्डा स्वतः पुढाकार घेऊन बुजविला. त्यांच्या या कार्यामुळे अनेकांनी त्यांना धन्यवाद दिले.

# वारली कलेने खुलला कशेडी बोगदा; कोकण संस्कृतीची अनोखी सफर!

**पोलादपूर : रामप्रहर वृत्त**

कशेडी घाटातील धोकादायक व वेड्यावाकड्या वळणांमुळे प्रवाशांसाठी त्रासदायक ठरणारा प्रवास आता बोगद्यामुळे अधिक सुलभ आणि वेगवान झाला आहे. मात्र, हा प्रवास केवळ सोयीस्करच नव्हे तर संस्मरणीयही व्हावा, यासाठी राष्ट्रीय महामार्ग विभागाने कशेडी बोगद्याच्या प्रवेश आणि निर्गमन मार्गावर आकर्षक वारली पेंटिंग साकारण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. या चित्रकलेमुळे बोगद्याच्या सौंदर्यात मोठी भर पडली असून, महामार्गावरून प्रवास करणाऱ्या पर्यटकांचे आणि वाहनचालकांचे विशेष लक्ष वेधले जात आहे.

बोगद्याच्या भिंतींवर कोकणातील लोकजीवन, येथील पारंपरिक संस्कृती, सण-उत्सव, ग्रामीण




जीवनशैली तसेच विविध पक्षी आणि प्राण्यांचे चित्रण करण्यात आले आहे. कोकणातील निसर्गसंपदा आणि लोकसंस्कृती यांचा सुंदर मिलाफ या चित्रांमधून अनुभवायला मिळत आहे. विशेष म्हणजे, वारली कलेची पारंपरिक शैली कायम ठेवत त्रिकोण, वर्तुळ आणि चौकोन अशा भूमितीय आकारांच्या साहाय्याने ही चित्रे साकारण्यात आली आहेत.वारली पेंटिंग ही महाराष्ट्रातील आदिवासी वारली समाजाची पारंपरिक लोककला असून ती भारतातील सर्वात प्राचीन लोककलांपैकी एक मानली जाते. मातीच्या लालसर पार्श्वभूमीवर पांढऱ्या रंगात रेखाटण्यात येणारी ही कला साधेपणातही प्रभावी संदेश देणारी म्हणून ओळखली जाते.

> **जाणाऱ्या पर्यटकांना प्रवासादरम्यान विरंगुळा मिळावा आणि त्यांचा थकवा दूर व्हावा, या संकल्पनेतून ही वारली पेंटिंग साकारण्यात येत आहे. विशेष म्हणजे, स्थानिक सुशिक्षित बेरोजगार तरुण निशांत वाघे याने ही सुंदर वारली पेंटिंग साकारली आहे.**
> **-पंकज गोसावी,**
> उपअभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग

# वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात पर्यटनस्थळे जास्त प्रमाणात असल्याने येथे पर्यटक अधिक संख्येने येत असतात. त्याचा वाहतूकीवरही परिणाम होतो. त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बुधवारी (दि.) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३२० वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून ,३६,०००/- रुपये इतका दंड आकारला आहे. त्यामुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

## दुखवटा

### आत्माराम आपटे



**रेवदंडा :** रायगड प्रेस क्लबचे माजी जिल्हा अध्यक्ष तसेच विद्यमान सल्लागार असलेले पत्रकार अभय आपटे यांचे वडील आत्माराम आपटे यांचे वृद्धापकाळाने गुरुवारी (ता.११) निधन झाले. निधनसमयी ते ९३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, सुन, नात व अन्य परिवार आहे.

# ‘त्या’ जमिनी होणार शासनजमा

## प्रस्ताव पाठवण्याचे मंत्री बावनकुळे यांचे निर्देश

**पनवेल : प्रतिनिधी**

रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी भूसंपादन अधिनियमानुसार विशिष्ट प्रकल्पासाठी संपादित जमिनीवर विहित कालावधीत प्रकल्प उभे राहिले नसल्यास ते परत करण्याची तरतूद असल्यास तपासणी करून यासंबंधीचा प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे दिले आहेत.

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी विशेष आर्थिक क्षेत्रासाठी संपादित केल्या होत्या. या जमिनीवर अद्यापपर्यंत कोणतेही प्रकल्प उभे राहिले नाहीत. त्यामुळे आता या जमिनी आपल्याला परत देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. या संदर्भात अधिनियमातील



तरतुदींनुसार या संपादित जमिनी शासनजमा करण्यासाठीसंदर्भातील प्रस्ताव पाठवावा, असे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.

पेण तालुक्यात विशेष आर्थिक क्षेत्रासाठी संपादित जमिनी परत मिळण्यासंदर्भात आमदार रविशेठ पाटील यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने मंत्रालयात मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी आमदार रविशेठ पाटील, वन व भूसंपादन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर उपस्थित होते. रायगड जिल्ह्यातील पेण विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या जमिनी विशेष आर्थिक क्षेत्रासाठी संपादित करण्यात आल्या होत्या. या प्रकल्पामध्ये आतापर्यंत कोणतेही प्रकल्प उभे राहिले नसल्याने या जमिनी मूळ जमीन मालकांना परत कराव्यात, अशी मागणी पाटील यांनी केली होती.

आता हा प्रस्ताव शासनाकडे आल्यानंतर विधी विभागाचा अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

# एसईझेड भूसंपादित जमिनी शेतकऱ्यांना परत मिळाव्यात

## भाजपचे मुकुंद गावंड यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**उरण : प्रतिनिधी**

उरण-पेण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मुंबई एसईझेड लि. कंपनीने घेतलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत मिळाव्यात यासाठी भाजपचे उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड व सहकाऱ्यांनी रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.



मुंबई एसईझेडने शेतकऱ्यांच्या जमिनी प्रकल्पासाठी घेताना शाळा, मंदिर, हॉस्पिटल बांधण्यात येतील तसेच नोकऱ्या व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असे आश्वासन दिले होते, मात्र जमीन घेऊन प्रकल्प तसेच नोकऱ्याही दिल्या नाहीत. हॉस्पिटल बांधले नाही, शाळा बांधली नाही की क्रीडांगण बांधले नाही. शेतकऱ्यांच्या जमिनी घेऊन त्यांचे अतोनात नुकसान केले आहे.

या जमिनी शेतकऱ्यांना परत मिळाव्यात, असे निवेदन जिल्हाधिकारी किशन जावळे यांना देण्यात आले. यावेळी माजी जि. प. सदस्य जीवन गावंड, प्राचार्य रमाकांत गावंड, रायगड किसान विकास मोर्चा उपाध्यक्ष गजानन गावंड, माजी सरपंच व ग्रामपंचायत सदस्य अमित पाटील, बलवंत गावंड, बाळू गावंड हेही उपस्थित होते.

# अवैध मासेमारीला लगाम : सागरी सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर प्रशासन आक्रमक

**उरण : प्रतिनिधी**

पावसाळ्यातील मासेमारी बंदीच्या काळात अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या नौकांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत. बंदी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या नौका व त्यावरील साहित्य जप्त करून नष्ट करण्याबरोबरच मदत करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर तसेच निष्क्रिय राहणाऱ्या पोलीस पाटलांवरही बरखास्तीची कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत.

सागरी सुरक्षेला निर्माण झालेल्या गंभीर धोक्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी हे कडक पाऊल उचलले आहे. पावसाळी मासेमारी बंदीची कठोर अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई, रायगड कार्यक्षेत्रातील विविध सुरक्षा विभागाच्या अधिकाऱ्यांची नुकतीच बैठक आयोजित करण्यात आली होती. नवी मुंबई, रायगड कार्यक्षेत्रातील पोलिस ठाणी, भारतीय नौसेना, इंडियन कोस्ट गार्ड, बंदर विभागाचे अधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

यावेळी मत्स्यव्यवसाय विभागाचे सहआयुक्त संजय पाटील यांनी पावसाळी मासेमारी बंदी कायदा मोडून काही मच्छीमार बोटी यांत्रिक नौकेवरील नाव, क्रमांक ऑईलपेंटने पुसून काढतात, झाकून ठेवून अवैधरित्या मासेमारी करतात. अशा प्रकारच्या अवैध मासेमारीच्या आडून करण्यात येत असलेल्या हालचालींमुळे सागरी सुरक्षेलाच गंभीर धोका निर्माण झाला आहे. अवैध मासेमारी करणाऱ्या या मच्छीमारांच्या आडून राष्ट्र व समाजविघातक कामांसाठी घुसखोरी होण्याची



शक्यता आहे. यामुळे घातपाताची शक्यता नाकारता येत नाही, अशी कैफियत मांडली.

यासाठी मनुष्यबळ कमी असतानाही मत्स्यव्यवसाय विभागाचे अधिकारी जीव धोक्यात घालून अवैध मासेमारी रोखण्यासाठी प्रयत्न करीत असतात. या उलट सुरक्षिततेसाठी तैनात करण्यात आलेले पोलीस, इंडियन नेव्ही, इंडियन कोस्ट गार्ड, सागर कवच यांसारख्या विशेष सुरक्षा यंत्रणांकडून अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या यांत्रिक बोटींवर कोणतीही कारवाई करीत नाही. यामुळे पावसाळी मासेमारी बंदी आदेशाची अंमलबजावणी करण्याचा संपूर्ण कामाचा ताण मत्स्यव्यवसाय विभागावर येऊन पडतो, असे पाटील यांनी स्पष्ट केले.

विशेषतः उरण-करंजा समुद्र परिसरातच दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पावसाळी मासेमारी का होते, अशी विचारणा करीत मुंबई, उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आदी सात सागरी जिल्ह्यांतील मच्छीमार मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांवर रोष व्यक्त करतात. यामुळे अधिकाऱ्यांना संघर्षाला सामोरे जावे लागते व कायदा-सुव्यवस्था बिघडण्याची स्थिती निर्माण होते, असेही त्यांनी सांगितले. मागील दोन वर्षांत रायगड मत्स्यव्यवसाय विभागाने कमी मनुष्यबळ असतानाही पावसाळी बंदीच्या आदेशानंतर अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या १०३ यांत्रिक बोटींवर कारवाई केली आहे. त्यांच्याकडून जप्त करण्यात आलेल्या बोटीवरील मासळीचा लिलाव, दंडात्मक कारवाईत ४३ लाख तीन हजार २१० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे, अशी माहिती सहआयुक्त संजय पाटील यांनी बैठकीत दिली.

रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी वस्तुस्थिती जाणून घेतल्यानंतर बंदी कायदा मोडून मच्छीमार बोटी यांत्रिक नौकेवरील नाव, क्रमांक ऑईलपेंटने पुसून काढतात, झाकून ठेवून अवैधरित्या मासेमारी करतात, ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे नमूद केले. मच्छीमारांच्या आडून राष्ट्र व समाजविघातक कामांसाठी घुसखोरी होण्याची शक्यता वर्तवून जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत कठोर ठोस कारवाई करण्याचे निर्देश मत्स्यव्यवसाय व विशेषतः पोलिसांना दिले. तसेच बंदीत मच्छीमार व त्यांना मदत करणाऱ्या सर्वांचीच सागरी सुरक्षा कायद्याअंतर्गत चौकशी करून कठोर कारवाई करावी. नौकांची मालकी स्पष्ट होत नसेल तर नौकांसह त्यावरील साहित्य जप्त करून नष्ट करण्यात यावे. यामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीची जरब बसेल आणि आदेशाचे उल्लंघन करण्यास यापुढे मच्छीमार धजावणार नाहीत, असे स्पष्ट आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी पोलिसांना दिले आहेत.

पावसाळी बंदीकाळात मासळी उतरविणे आणि विक्रीसाठी उरणमधील २६ ठिकाणी जमाव जमतो. अशा ठिकाणी संबंधित कार्यक्षेत्रातील पोलीस पाटलांची मदत घ्यावी. पोलीस पाटलांनीही जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली नाही तर जबाबदारी निश्चित करून पोलीस पाटील पदावरून बरखास्त करण्याचेही कडक निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी पोलिसांना दिले आहेत.

# घरफोडीप्रकरणी दोघांना यूपीतून अटक

## कळंबोली पोलिसांची कारवाई; आयुक्तांकडून गौरव

**कळंबोली : प्रतिनिधी**

कळंबोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या घरफोडीच्या गंभीर गुन्ह्याचा कौशल्यपूर्ण तपास करून दोन आरोपींना उत्तर प्रदेशातून अटक करण्यात कळंबोली पोलिसांना यश आले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कारवाईत गुन्हे प्रकटीकरण प्रमुख अमोल चौगुले, पोलीस कॉन्स्टेबल महेंद्र गायकवाड, निलेश सोळुंखे, शरद मराठे यांच्या पथकाने आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

आरोपींकडून चोरीस गेलेल्या मालापैकी तब्बल १३ लाख ७० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल संपूर्ण तपास पथकाचा नवी मुंबई पोलीस



आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. सदर गुन्ह्यात आरोपींनी भरदिवसा घरफोडी करून सुमारे २० तोळे सोन्याचे दागिने, ९३ ग्रॅम चांदीचे दागिने व वस्तू तसेच १२ हजार रुपये रोख रक्कम असा मोठा ऐवज लंपास केला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन कळंबोली पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. तपासादरम्यान पोलिसांनी जवळपास ७० ते ८० ठिकाणांवरील सीसीटीव्ही फुटेज बारकाईने तपासले तसेच आधुनिक तांत्रिक विश्लेषणाचा वापर करून गुन्ह्याशी संबंधित गुगल आयडी तसेच एकूण दहा मोबाईल क्रमांकांचे सखोल विश्लेषण करण्यात आले.

तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींची ओळख निश्चित करण्यात पोलिसांना यश आले. तपासादरम्यान आरोपी हे उत्तर प्रदेश राज्यातील आंबेडकर नगर जिल्ह्यात लपून राहत असल्याची माहिती मिळाल्यानंतर विशेष तपास पथकाने तेथे जाऊन सापळा रचला. दरम्यान, पोलिसांची चाहूल लागताच एक आरोपी शेताच्या दिशेने पळून गेला होता, मात्र पोलिसांनी जवळपास ५०० मीटरपर्यंत त्याचा पाठलाग करून त्याला शिताफीने ताब्यात घेतले. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार दुसऱ्या आरोपीलाही अटक करण्यात आली.

# उरीतील ग्रेनेड स्फोटात जवान विक्रम चव्हाण शहीद; उरणकर हळहळले

**उरण : प्रतिनिधी**

जम्मू-काश्मीरमधील उरी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ गस्तीदरम्यान झालेल्या ग्रेनेड स्फोटात जवान विक्रम बाळकृष्ण चव्हाण यांना वीरमरण आले. काही काळ नवी मुंबईतील उरण येथे वास्तव्यास असलेल्या चव्हाण यांच्या निधनाची बातमी समजताच उरणसह संपूर्ण नवी मुंबईत हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. देशसेवेचे कर्तव्य बजावताना त्यांनी दिलेल्या सर्वोच्च बलिदानाबद्दल नागरिकांकडून अभिमान व्यक्त केला जात असतानाच त्यांच्या निधनामुळे शोककळाही पसरली आहे.

उरी सेक्टरमधील कमलकोट भागात नियंत्रण रेषेजवळ सैन्याचे पथक नियमित गस्त घालत असताना हा स्फोट झाला. शत्रूकडून घुसखोरी रोखण्यासाठी पेरण्यात आलेल्या स्फोटकाचा अचानक स्फोट झाल्याने



विक्रम चव्हाण व सातारा जिल्ह्यातील शाहपूर येथील जवान अर्जुन जाधव गंभीर जखमी झाले. सहकाऱ्यांनी दोघांनाही तातडीने श्रीनगर येथील लष्करी रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. यामुळे महाराष्ट्राने आपले दोन सुपुत्र गमावले आहेत. मूळचे कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुक्यातील गौंदवले पोस्ट ब्रह्मपुरी येथील रहिवासी असलेले विक्रम चव्हाण काही वर्षांपूर्वी उरण परिसरात भाडेतत्त्वावर राहत होते. त्यानंतर कुटुंबीयांसह ते मूळ गावी स्थलांतरित झाले.

विक्रम चव्हाण यांच्या बलिदानाने उरणसह नवी मुंबई हळहळली असून सर्व स्तरांतून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात येत आहे.

# वीजपुरवठा सुरळीत करण्याची स्त्री शक्ती फाउंडेशनची मागणी



**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका हद्दीतील कळंबोली, कामोठे, नवीन पनवेल, खारघर आणि आसपासच्या परिसरात गेल्या काही दिवसांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे महिलांना मानसिक, शारीरिक आणि आरोग्यविषयक त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर स्त्री शक्ती फाउंडेशन संस्थापिक अध्यक्ष विजया कदम यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे निवेदन सादर करून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी करण्यात आली आहे.

संस्थेच्या संस्थापिका विजया कदम यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षांना दिलेल्या निवेदनात नमूद केले की, वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर तासन्‌तास होणाऱ्या वीजखंडितीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. याचा सर्वाधिक परिणाम गर्भवती महिला, प्रसूतीनंतरच्या माता, ज्येष्ठ महिला, आजारी महिला तसेच लहान बालकांची काळजी घेणाऱ्या मातांवर होत आहे. स्त्री शक्ती फाउंडेशनने महिला आयोगाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन महिलांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि सन्मानाच्या दृष्टीने तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे.

# उरणमध्ये 'आगमन पावसाचे' थीमवर रंगणार मधुबन कट्टा

**उरण : बातमीदार**

कोकण मराठी साहित्य परिषद आणि मधुबन कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने उरण शहरातील विमला तलाव परिसरात दर महिन्याच्या १७ तारखेला खुल्या उद्यानात कविसंमेलन आयोजित केले जाते. यंदा 'आगमन पावसाचे' विषयावर मधुबन कट्ट्याचा १२८वा काव्यमैफलीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे.

पाऊस व मानवाचा जिव्हाळ्याचा संबंध आहे, एक अतूट असे नाते आहे आणि हेच नाते विशद करण्यासाठी 'आगमन पावसाचे' विषयावर मधुबन कट्ट्याचा १२८वा कवितांचा कार्यक्रम



बुधवारी (दि. १७) सायंकाळी ५ वाजता उरण शहरातील विमला तलाव येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला ज्येष्ठ कवी तथा ज्येष्ठ साहित्यिक एल. बी. पाटील व चैतन्य पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या कविसंमेलनाच्या निमित्ताने सुरेश शिंदे व पुंडलिक म्हात्रे यांना जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. दरम्यान, काव्यसंमेलनाचे औचित्य साधून 'टोल विरुद्ध एल्गार' या काव्य स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे. यावेळी सुनील पाटील, अवंतिका महाडिक, मनोहर म्हात्रे, वैभव धनवडे, कल्पना दिलीप म्हापूसकर, नरेश पाटील यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. यावेळी कवी, साहित्यिक, रसिक प्रेक्षकांनी या कविसंमेलनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अनधिकृत टपऱ्यांवर महापालिकेची कारवाई

**पनवेल : बातमीदार**

पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानुसार प्रभाग समिती ‘ड’ अंतर्गत नवीन पनवेल येथील गणेश मार्केट परिसरातील अनधिकृत टपऱ्यांवर कारवाई करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे तसेच उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या निर्देशानुसार ही कारवाई झाली.

अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या टपऱ्या व अतिक्रमणांविरुद्ध महानगरपालिका नियमितपणे कारवाई करत असून कारवाईदरम्यान विरोध करणाऱ्या संबंधितांवरही नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. शहरातील रस्ते, पदपथ व सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.



**पनवेल : भाजप ओबीसी सेलचे तालुका अध्यक्ष आप्पा भागीत यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त पक्षाचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या.**

## संपादकीय

# जहाजांवरील हल्ले निषेधार्ह

आखाती प्रदेशात व्यापारी मालवाहू जहाजांवर होत असलेले सततचे हल्ले चिंताजनक असून ते अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्या दरम्यान दीर्घकाळ सुरू असलेल्या संघर्षाचा थेट परिणाम आहेत. ओमानजवळील अशाच एका हल्ल्यात बुधवारी तिघा भारतीय खलाशांचा मृत्यू झाला. भारताने या हल्ल्यांचा निषेध केला असून आंतरराष्ट्रीय कायद्यांच्या आधारे या प्रदेशातील सागरी मार्गांवर निर्बंधमुक्त वाहतूक आणि व्यापार पुन्हा सुरू होणे आवश्यक आहे.

**पश्चिम आशियातील तणाव पुन्हा वाढला असून युद्धविरामाच्या वाटाघाटी आणि शांतता चर्चाही धोक्यात आल्याचे चित्र निर्माण झाल्याने जगभरात चिंतेचे वातावरण आहे. अमेरिकेच्या लष्कराचे हेलिकॉप्टर इराणने पाडल्याचा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी केल्यानंतर बुधवारी या दोन देशांमधील संघर्ष पुन्हा तीव्र झाला. अमेरिका-इस्रायलने २८ फेब्रुवारीला इराणवर हल्ले केल्यानंतर सुरू झालेल्या या युद्धाने अवघ्या जगाच्या अर्थव्यवस्थेला मोठा हादरा दिला आहे. जगभरातील इंधनाच्या किमती वाढल्या असून अनेक देशांपुढे इंधनपुरवठ्याची समस्या आ वासून उभी आहे. या संघर्षामुळे अवघे जग संकटात लोटले गेले असताना अमेरिकेने बुधवारी पुन्हा होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळील इराणच्या लष्करी ठिकाणांवर हल्ले केले तर या हल्ल्यांना उत्तर देताना इराणने बहारिन, कुवेत आणि जॉर्डन या देशांमधील अमेरिकेच्या लष्करी तळांना लक्ष्य केले. एकीकडे हे सुरू असतानाच ओमानच्या किनाऱ्याजवळ बुधवारी 'सेटेबेलो' नावाच्या व्यावसायिक जहाजावर अमेरिकी नौदलाने हल्ला केला. हे तेलवाहू जहाज इराणमधून तेल वाहून नेत असताना त्यांनी लागू असलेल्या निर्बंधांचे उल्लंघन केल्याचे अमेरिकन सेंट्रल कमांडने म्हटले आहे. अमेरिकन दलाने वारंवार इशारे देऊनही जहाजाच्या चालक दलाने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर अमेरिकन विमानाने या जहाजाच्या इंजिनला लक्ष्य करून त्यावर अचूक हल्ला केला. अमेरिकन सैन्याने या कारवाईचा व्हिडिओ प्रसिद्ध केला आहे. या जहाजावरील २४ भारतीय कर्मचाऱ्यांपैकी २१ जणांना वाचवले गेले असले तरी तिघा भारतीय खलाशांचा हल्ल्यात मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने या हल्ल्याप्रकरणी नवी दिल्लीतील अमेरिकेच्या दूतावासातील प्रमुख अधिकाऱ्याला बोलावून तीव्र निषेध नोंदवला. या घटनेमुळे आखाती प्रदेशातील सागरी व्यापारी मार्गांच्या सुरक्षेबाबत पुन्हा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. पश्चिम आशियातील व्यावसायिक जहाजे आणि नागरी पायाभूत सुविधांना लक्ष्य करणे थांबले पाहिजे, तसेच आंतरराष्ट्रीय जलमार्गांवरून विनाअडथळा वाहतूक पूर्ववत झाली पाहिजे असे ठाम प्रतिपादन भारताने केले आहे. इराणी बंदरावरील अमेरिकेची नाकेबंदी तोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या 'पलाऊ' जहाजावरही सोमवारी अमेरिकी नौदलाने हल्ला केला होता. त्यावरही भारतीय खलाशी होते व नंतर त्यांची सुरक्षित सुटका करण्यात आली. या प्रदेशात जहाजांवर होणारे सततचे हल्ले चिंताजनक असल्याचे भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले असून राजनैतिक तोडग्यासाठी सुरू वाटाघाटी पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. मात्र अमेरिका आणि इराण यांच्यात परस्परांवर आरोप व टीकाच सुरू असल्याचे दिसते आहे. करारावर चर्चेसाठी इराण विलंब करीत असल्याने त्यांना त्याची किंमत मोजावी लागेल असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. दुसरीकडे इराणने कुठलीही राजनैतिक प्रक्रिया सुरू ठेवण्यासाठी किमान स्थिर वातावरण असायला हवे अशी भूमिका घेतली. परस्परविरोधी संदेश देऊन अमेरिका शस्त्रसंधीचे उल्लंघन करत आहे, असे इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने म्हटले आहे.**

# रायगडातील भूजल साठा घटतोय!

**खबरबात**
प्रकाश सोनवडेकर

दरवर्षी ३००० मिमी सरासरीने पाऊस पडणाऱ्या रायगड जिल्ह्याच्या भूगर्भातील पाणीसाठा दिवसेंदिवस घटतोय. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या ताज्या पाहणीनुसार मागील पाच वर्षांच्या तुलनेत यंदा भूजल पातळीत सरासरी ०.४९ मीटरची घट झाली आहे. ही चिंतेची बाब आहे. याबाबत सर्वांनीच विचार केला पाहिजे. जमिनीत पाणी जिरवण्यासाठी अधिक प्रभावी उपाययोजना राबवणे गरजेचे आहे.रायगडचा बहुतांश भूभाग बेसाल्ट या अग्निजन्य खडकाने व्यापलेला असल्याने पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साठवून ठेवण्याची नैसर्गिक क्षमता मर्यादित आहे. त्यातच वाढती वृक्षतोड आणि डोंगरमाथ्यांवरील होणारी मातीची धूप यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी थेट नद्या-खाड्यांमार्गे समुद्रात वाहून जाते. परिणामी, विक्रमी पावसाचा लाभ भूगर्भातील जलसाठ्याला मिळत नाही. जिल्ह्यात जलयुक्त शिवार, पाणी अडवा-पाणी जिरवा आणि जलजीवन मिशनसारख्या महत्त्वाकांक्षी योजना राबवल्या जात असतानाही भूगर्भातील जलसाठा अपेक्षित प्रमाणात वाढत नाही. सुधागड आणि पोलादपूर



तालुक्यांतील काही नमुना विहिरींमध्ये भूजल पातळीत लक्षणीय घट आढळून आली आहे. ही परिस्थिती कायम राहिल्यास उन्हाळ्यात विहिरी, कूपनलिका आणि लहान पाणीपुरवठा योजनांवर त्याचा थेट परिणाम होऊ शकतो. त्यामुळे जलसंधारणासोबतच वृक्षलागवड, डोंगर उतारांवरील मृदा संवर्धन आणि पावसाचे पाणी जमिनीत मुरवणाऱ्या उपाययोजनांवर भर देण्याची गरज तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. अन्यथा भविष्यात मुसळधार पाऊस पडूनही रायगडला तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो, अशी भीती तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. त्यामुळे पाणी जिरवण्यासाठी अधिक प्रभावी उपाययोजना राबवणे गरजेचे आहे.दुसरीकडे धरणांमधील पाणीसाठा कमी होत आहे. धरणांना गळती लागली आहे. धरणे गाळाने भरली आहेत. त्यामुळे या धरणांची पाणी साठवून ठेवण्याची



क्षमता कमी झाली आहे. रायगड जिल्ह्यात पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीतील २८ धरणे आहेत. यामधून जिल्ह्यातील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यात येतो. यातील अनेक धरणे ३० ते ४० वर्षांपूर्वी बांधण्यात आली आहेत. मातीने बांधण्यात आलेल्या या धरणांना गळती लागली आहे. ही गळती थांबवली पाहिजे. धरणे गाळाने भरली आहेत. या धरणांमधील गाळ काढून त्यांची पाणी साठवण्याची क्षमता वाढवली पाहिजे. रायगड जिल्ह्यात हातपंप १५८५, दुहेरी पंप ९२, विहिरी २८३८, नळ योजना १०६०, लघु नळ योजना १४५, प्रादेशिक नळ योजना २८३ असे एकूण ६,००३ पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत आहेत. या पाण्याच्या स्त्रोतांचे बळकटीकरण करण्यावर जिल्हा प्रशासनाने जास्त लक्ष दिले पाहिजे. दरवर्षी कोट्यवधी रुपये टँकरवर खर्च करण्याऐवजी छोटे बंधारे बांधून पाणी अडवता येईल. जे जुने बंधारे आहेत त्यांची दुरुस्ती करून, त्यांमध्ये साचलेला गाळ काढून त्यांची खोली वाढवल्यास पाणी साठवून ठेवण्याची क्षमता वाढेल. या बंधाऱ्यांमधील पाणी झिरपून भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल.पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे बळकटीकरण करणे, अस्तित्वात असलेले व निकामी झालेले सिमेंट बंधारे, माती बंधारे, गावतळी, पाझर तलाव या जलयुक्त स्त्रोतांची पाणी साठवण क्षमता पुनर्स्थापित करणे, जलस्त्रोतांचा पाणीसाठा वाढवणे, पाण्याचा अपव्यय टाळणे, पिण्याच्या पाण्याच्या मुख्य स्त्रोतांव्यतिरिक्त परिसरातील इतर उपलब्ध स्त्रोतांमधील पाण्याचा दैनंदिन वापरासाठी वापर केल्यास पाण्याची बचत होऊ शकते. पाणी उपसा होतो, परंतु स्त्रोतांचे पुनर्भरण होत नाही. जिल्ह्यात भरपूर पाऊस पडतो. हे पावसाचे पाणी नदी-ओढ्यांमधून समुद्राला जाऊन मिळते. हे पाणी अडवून ते जमिनीत जिरवले पाहिजे. विहिरी आणि विंधण विहिरींचे पुनर्भरण यांसारखे उपक्रम राबविणे गरजेचे आहे. पाण्याच्या वापराबाबत जनतेत जाणीव व जागृती निर्माण करावी लागेल. जल साक्षरता मोहीम राबवायला हवी.



## बदलते तंत्रज्ञान

# एआय टूलसह बनवा रिअलिस्टिक व्हिडीओ




व्हीइओ-३ हे गुगल डीपमाइंडने तयार केलेले एआय व्हिडीओ जनरेशन मॉडेल आहे. ते मजकूर किंवा प्रतिमांमधून ८ सेकंदांचे उच्च-गुणवत्तेचे व्हिडीओ तयार करू शकते. व्हिडीओ तयार करण्यासोबतच संवाद, ध्वनी प्रभाव आणि संगीत तयार करण्याचे वैशिष्ट्य ते ओपन एआयच्या सोरा आणि रनवे एमएलसारख्या साधनांपेक्षा वेगळे बनवते.

उदाहरणार्थ, जर तुम्ही अल्बर्टातील जंगलातील आगींबद्दल एक न्यूज अँकर रिपोर्ट करतो असे टाइप केले तर व्हीइओ-३ केवळ न्यूज अँकरचा व्हिडीओ तयार करणार नाही तर त्याचा आवाज, ध्वनी प्रभाव आणि पार्श्वभूमी संगीत देखील जोडेल. हे व्हिडीओ 4K रिझोल्यूशनमध्ये तयार केले जातात, जे त्यांना अत्यंत वास्तववादी बनवते.

व्हीइओ-३ चा वापर गुगलच्या जेमिनी ॲप आणि फ्लो प्लॅटफॉर्मद्वारे करता येतो. फ्लो हे गुगलने क्रिएटर्ससाठी बनवलेले एक खास ॲप आहे. यामध्ये तुम्ही व्हिडीओला अधिक चांगल्या पद्धतीने कस्टमाइझ करू शकता. हे टूल मूड, टोन आणि सांस्कृतिक सेटिंग्ज समजून घेऊन सिनेमॅटिक व्हिडीओ तयार करते.

व्हिडीओ तयार करण्यासोबतच संवाद, ध्वनी प्रभाव आणि संगीत निर्माण करण्याची सुविधा त्याला वेगळे बनवते.

व्हीइओ-३ आपले जीवन बदलू शकते?


व्हीइओ-३ चा वापर शिक्षण आणि प्रशिक्षणातदेखील केला जाऊ शकतो. शाळा, महाविद्यालय आणि कॉर्पोरेट प्रशिक्षणासाठी वास्तववादी व्हिडीओ तयार करणे आता सोपे झाले आहे.

शिक्षक इतिहास, विज्ञान किंवा भूगोलावरील व्हिडीओ तयार करण्यासाठी व्हीइओ-३ वापरू शकतात. उदाहरणार्थ शिक्षकाला दुसरे महायुद्ध बद्दल शिकवायचे असते. म्हणून व्हीइओ-३ च्या मदतीने असे व्हिडीओ तयार करता येतात ज्यात सैनिक आणि रणगाडे दिसतात. हे पाहून मुलांना समजणे सोपे जाईल.

एका वैद्यकीय महाविद्यालयाने व्हीइओ-३ वरून एक शस्त्रक्रिया सिम्युलेशन व्हिडीओ तयार केला होता, ज्यामध्ये एक डॉक्टर ऑपरेशन करत होता. तो पाहून विद्यार्थ्यांनी व्यावहारिक ज्ञान मिळवले.

# लोकप्रिय लेखक पु.ल. देशपांडे

**निमित्त**



मराठी भाषेने देशाच्या जडणघडणीमध्ये फार मोठा वाटा निर्माण केलेला आहे. महाराष्ट्राने प्रत्येक क्षेत्रामध्ये भारताला एक वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवण्यासाठी नेहमीच प्रयत्न केले आहे. यामध्ये साहित्य क्षेत्रदेखील मागे नाही. महाराष्ट्रामध्ये अनेक दिग्गज साहित्यकार होऊन गेले. ज्यांच्या साहित्य निर्मितीमुळे मराठी भाषा समृद्ध होण्याबरोबरच मराठी भाषेला आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील ओळख मिळण्यास देखील मदत झालेली आहे. असेच एक सर्वांच्या परिचयाचे व सर्वांचे लाडके लेखक म्हणून पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे म्हणजेच पु.ल. देशपांडे उर्फ भाई उर्फ पुल हे लोकप्रिय मराठी लेखक, नाटककार, नट, कथाकार व पटकथाकार, दिग्दर्शक आणि संगीत दिग्दर्शक होते.

पु. ल. देशपांडे यांचा जन्म ८ नोव्हेंबर १९१९ रोजी मुंबईतील गावदेवी या भागात झाला. पार्ले टिळक विद्यालयातून माध्यमिक शिक्षण पूर्ण करून पुल मुंबईतील इस्माईल युसुफ कॉलेजातून इंटर व सरकारी लॉ कॉलेजमधून एलएल.बी. झाले आणि कलेक्टर कचेरी व प्राप्तीकर विभागात काही काळ नोकरी करून पुण्याला आले. त्यापूर्वी ते पेट्रोल रेशनिंग ऑफिसमध्ये कारकून आणि ओरिएंटल हायस्कूलमध्ये शिक्षक होते. पुण्याला आल्यावर त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमधून बी.ए.आणि नंतर एम.ए. केले.

१९३७ पासून नभोवाणीवर पुल मोठ्या नाटिकांत भाग घेऊ लागले. त्या वर्षी त्यांनी अनंत काणेकरांच्या 'पैजार' या श्रुतिकेत काम केले. २०१४ मध्ये प्रकाशित झालेले 'बटाट्याची चाळ' हे त्यांचे विनोदी पुस्तक प्रसिद्ध आहे. १९४८ साली पुल यांनी 'तुका म्हणे आता' हे नाटक आणि 'बिचारे सौभद्र' हे प्रहसन लिहिले. १९४७ ते १९५४ या काळात त्यांनी चित्रपटांमध्ये आणि चित्रपटांसाठी काम केले. 'वंदे मातरम', 'दूधभात' आणि 'गुळाचा गणपती' या चित्रपटांत अष्टपैलू कामगिरी केली. १९४७ सालच्या 'कुबेर' चित्रपटाला त्यांनी संगीत दिले.

पुल यांनी 'अंमलदार', 'गुळाचा गणपती', 'घरधनी', 'चोखामेळा', 'दूधभात', 'देव पावला', 'देवबाप्पा', 'नवराबायको', 'नवे बिर्‍हाड', 'मानाचे पान' आणि 'मोठी माणसे' या अकरा चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन केले. याशिवाय ज्योत्स्ना भोळे, माणिक वर्मा व आशा भोसले यांच्याकडून भावगीते पुलंनी गाऊन घेतली १९५५ मध्ये पुल 'आकाशवाणी'त (ऑल इंडिया रेडिओत) नोकरीला लागले. त्यांनी अनेक श्रुतिका लिहिल्या आणि भाषणे दिली. ५६-५७ मध्ये ते आकाशवाणीवर प्रमुख नाट्यनिर्माता झाले. पु ल देशपांडे यांनी लेखन क्षेत्रामध्ये आपली कारकीर्द गाजवलीच, त्याचबरोबर त्यांनी नाटक क्षेत्रांमध्ये देखील मोलाचे कामगिरी केली आहे. सोबतच त्यांनी चित्रपटांमध्ये काम करत आपल्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा परिचय दिलेला आहे. त्यांनी एक उत्तम वक्ता हा किताब देखील मिरवला होता. पु. ल. देशपांडे यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये पद्मभूषण व पद्मश्रीचा समावेश आहे. अशा या लोकप्रिय लेखकाचे १२ जून २००० रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# तुम्हाला माहीत आहेत का लस्सी पिण्याचे फायदे?

उष्णतेचा त्रास झाला की आपण वेगवेगळे उपाय करतो मात्र तुम्हाला माहितीये का उष्णतेचा त्रास होत असेल तर लस्सीचे सेवन केलं जातं. गोड लस्सी प्यायल्याने पचनसंस्था मजबूत होते आणि पोट निरोगी राहते. गोड लस्सीमध्ये अनेक पोषक घटक असतात जे आपल्या पोटातील बद्धकोष्ठता आणि सिडिटीची समस्या सहज दूर करण्याचे काम करतात. गोड लस्सी शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. कारण त्यात सोडियम, प्रथिने आणि फायबर भरपूर प्रमाणात असतात. ज्यामुळे पचनसंस्था मजबूत होण्याबरोबरच हाडेही मजबूत असतात. चला तर मग द्याची लस्सीचे फायदे आणि कृती पाहूयात.



**पचनक्रिया मजबूत ठेवण्यासाठी**

लस्सीचे सेवन केल्याने पचनक्रिया सुरळीत ठेवण्यासोबतच पचनक्रिया मजबुत होण्यासाठीही मदत होते. कारण यामध्ये मुबलक प्रमाणात बॅक्टेरिया असतात. जर तुम्हाला पोटाच्या समस्यांचा सामना करावा लागत असेल तर लस्सी त्यावर गुणकारी ठरते.

मसालेदार पदार्थ किंवा बाहेरी पदार्थ खाल्याने ॲसिडिटीच्या समस्येचा सामना करावा लागतो. उन्हाळ्यामध्ये ॲसिडीटीची समस्येचा त्रास आणखी वाढतो. लस्सी यावर अत्यंत परिणामकारक ठरते. लस्सी थंड असते त्यामुळे ॲसिडिटी, अपचन यांसारख्या समस्यांवर फायदेशीर ठरते.

**हाडांसाठी फायदेशीर**

लस्सीमध्ये कॅल्शिअम मुबलक प्रमाणात असतं. ज्यामुळे हाडांच्या मजबुतीसाठी ही फायदेशीर ठरते. हाडांच्या समस्या दूर करण्यासाठी दररोज लस्सी पिणं फायदेशीर ठरतं.

**ब्लड प्रेशर कंट्रोलमध्ये ठेवण्यासाठी**

लस्सी प्यायल्याने ब्लड प्रेशर कंट्रोलमध्ये राहतं. अनेक संशोधनांमधून ही गोष्ट सिद्ध करण्यात आली आहे की, लस्सीमध्ये असलेलं पोटॅशिअम आणि रिबोफ्लेविन यांसारखी तत्व ब्लड प्रेशर नैसर्गिक पद्धतीने कंट्रोल करतात.

**बटरस्कॉच लस्सी कृती**

प्रथम दोन कप ताजे दही, एक कप मलईदार दूध, तीन चमचे साखर,काही काजूचे तुकडे, चिमूटभर काळे मीठ आणि अर्धा कप बटर स्कॉच आइस्क्रीम घ्या. नंतर मिक्सर जार घ्या आणि सर्व साहित्य घाला आणि एकदा मिसळा. नंतर सर्व्हिंग ग्लासमध्ये फिरवून थंड थंड सर्व्ह करा.

# सरकारी रुग्णालयांत मुबलक अँटी स्नेक व्हेनम साठा उपलब्ध व्हावा

## कृषी सभापती वैकुंठ पाटील यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



**पेण : प्रतिनिधी**

यंदाच्या खरीप हंगामातील शेतीच्या कामांना सुरुवात झाली आहे. पावसाळ्यात ग्रामीण भागातील जनतेला, विशेषतः शेतकरी बांधवांना शेतात काम करताना सर्पदंश होण्याची अधिक भीती असते. हीच बाब लक्षात घेऊन रायगड जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे तसेच शासकीय रुग्णालयांमध्ये सर्पदंशावर लागणाऱ्या अँटी स्नेक व्हेनम औषध साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध ठेवावा, अशी मागणी रायगड जिल्हा परिषद अलिबागचे कृषी, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभापती वैकुंठ रवींद्र पाटील यांनी रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडे केली आहे. ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणेच्या त्रुटींवर बोट ठेवत तातडीने उपाययोजना करण्याची विनंती वैकुंठ पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केली आहे.

पावसाळ्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे प्राण वाचविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने पावले उचलणे गरजेचे आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि शासकीय रुग्णालयांमध्ये सर्पदंशावरील औषधांचा तुटवडा भासणार नाही याची दक्षता घ्यावी. जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या स्तरावरून संबंधित सर्व यंत्रणेला याबाबत तातडीने योग्य त्या सूचना द्याव्यात, अशी विनंती पाटील यांनी केली आहे.

या पत्राच्या प्रती कार्यवाहीसाठी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा रुग्णालय अलिबागचे जिल्हा शल्यचिकित्सक आणि रायगड जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनाही पाठवण्यात आल्या आहेत.

सर्पदंश झालेल्या शेतकऱ्याला किंवा नागरिकाला तातडीच्या उपचारासाठी नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र अथवा शासकीय रुग्णालयात दाखल केले जाते. परंतु, अनेकदा या ठिकाणी सर्पदंशावरील आवश्यक औषधे उपलब्ध नसतात. वेळेवर योग्य उपचार न मिळाल्यामुळे यापूर्वी अनेक रुग्णांना आपले प्राण गमवावे लागल्याच्या दुर्दैवी घटना जिल्ह्यात घडल्या असल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.


वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मौजे मोहो, तालुका – पनवेल, जिल्हा–रायगड.**

| भुमापन नं. / हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| १२७/३/२ | ०–१०–०० | २.०९ | श्री. राजेंद्र महादेव पाटील |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१४ दिवसांच्या** आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ११/०६/२०२६.


**सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक मुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१


## नागोठणे–अलिबाग मार्गावर गतिरोधकावरील पांढऱ्या पट्ट्यांच्या अभावामुळे अपघाताचा धोका

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे–अलिबाग मार्गावरील अनेक गतिरोधकांवर पांढरे परावर्तित पट्टे नसल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः मोटारसायकलस्वारांसाठी हा प्रकार धोकादायक ठरत असून अपघाताची शक्यता वाढली आहे.



रात्रीच्या वेळी तसेच भर उन्हात गतिरोधक स्पष्टपणे दिसत नसल्यामुळे वाहनचालकांना त्यांचा अंदाज येत नाही. अचानक समोर येणाऱ्या गतिरोधकांमुळे दुचाकीस्वारांचा तोल जाऊन अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या मार्गावरून दररोज हजारो प्रवासी प्रवास करत असताना संबंधित यंत्रणेचे या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.गतिरोधकांवर आवश्यक त्या ठिकाणी पांढरे परावर्तित पट्टे व इशारा फलक लावण्यात यावेत, अशी मागणी वाहनचालक व प्रवासी वर्गाकडून करण्यात येत आहे. भविष्यात कोणतीही जीवितहानी होण्यापूर्वी अलिबाग येथील जिल्हा बांधकाम विभागाने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## आंबोलीतील अंगणवाडी इमारतीच्या तोडफोडप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यामधील आंबोली गावातील अंगणवाडी इमारतीची तोडफोड केल्याप्रकरणी उंडर गावात दोन तरुणांवर सार्वजनिक मालमतेचे नुकसान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबतचे सविस्तर वृत्त असे की, आंबोली गावात लहान मुलांना शिकण्यासाठी अंगणवाडी इमारत होती. इथे गावातील लहान मुले आपले प्राथमिक शिक्षण घेत असतात. परंतु अंगणवाडीचे दरवाजे रात्री बंद असताना उंडर गावात राहणारे दोन तरुण निकेतन सातमकर व प्रणय गुंड यांनी रात्री अंधार असताना अंगणवाडी च्या हॉल मधील दोन खिडक्या , स्टोअर रूम व स्वयंपाक घरातील खिडक्यांच्या काचा फोडून सामानाची तोडफोड करून अंगणवाडी इमारतीचे मोठे नुकसान केले.

त्यामुळे या इमारतीचे मोठे नुकसान झाले असल्याची तक्रार येथील अंगणवाडी सेविका इंदिरा ठाकूर यांनी मुरुड पोलिस ठाण्यात दाखल केली. त्यांच्या तक्रारीची दखल कर्तव्यदक्ष पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी या दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.


### पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६

#### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री. समीर बळाशेठ ठाकूर, नगरसेवक प्रभाग –क्र. १६, कार्यालय पत्ता :–पनवेल, जि. रायगड | ०१ नारळ झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील **रोड नं.–१४, सेक्टर १. नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड** येथे प्लॉट नं. २७च्या शेजारील उद्याना मधील ०१ नारळ झाड अत्यंत धोकादायक झुकलेल्या स्थितीत असून पडण्याची शक्यता आहे. |
| २ | M/s. Evergreen Associates, 1st Floor, Neel Avenue, Above ICICI Bank, Plot No.05, Panvel- Matheran Road, Sector-19, New Panvel (E). | ०१ पिंपळ झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील फायनल प्लॉट नं–३८०, पनवेल एस.टी. स्टॅन्डमागे, ता. पनवेल, जि. रायगड या भूखंडाच्या आवारातील ०१ झाड नवीन इमारत बांधकाम करणेस बाधित होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

**PMC-PARK/252/2026-PTAD**
**दिनांक :– १२/०६/२०२६**


## तळा तालुक्यातील पोलीस पाटलांची रिक्त पदे त्वरित भरण्याची मागणी

**तळा : प्रतिनिधी**

ग्रामीण दुर्गम डोंगराळ तालुक्यातील पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्याची मागणी तळा पोलीस पाटील संघटनेचे तालुकाध्यक्ष कांतीलाल कसबले यांनी केली आहे. महसूल आणि नागरिक यांच्यामधील महत्वाचा दुवा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तळा तालुक्यात फक्त २० कार्यरत पोलीस पाटील आहेत महसूल आणि पोलीस प्रशासनासाठी महत्वाचा प्रतिनिधी असलेल्या पोलीस पाटील यांची रिक्त पदे भरणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे शासनाने ही पदे तात्काळ भरावीत, अशी मागणी नागरिकांतूनही होताना पहावयास मिळत आहे.

तळ तालुक्यात महसुली गावे ७० व एक नगरपंचायत आहे, तर २० पोलीस पाटील कार्यरत आहेत. कायदा व सुव्यवस्थेची माहिती देण्याचे तसेच महसूल प्रशासनाला मदत करण्याचे काम कार्यरत पोलीस पाटील यांच्या मार्फत केले जाते. गाव वाड्यांमध्ये शांतता आणि कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्ह्यांची माहिती देणे, आपत्कालीन परिस्थितीत मदत करणे, निवडणुकीत मदत करणे. दरोडा, शांतता भंग किंवा इतर गुन्हेगारी कृत्यांपासून गावाला सुरक्षित ठेवणे, गैरवर्तन किंवा दुर्लक्षाच्या घटनांची माहिती पोहोचवणे, अशा अनेक प्रकारची कामे पोलीस पाटील करतात.

## खोपोलीतील सोसायटीमध्ये पार्किंगवरून हाणामारी

**खोपोली :** जेसल ग्रीन सोसायटीत कार पार्कींग वरून झालेल्या वादातून संतोष मारुती मोरे याना मारहाण झाल्याची घटना घडली आहे. जेसल ग्रीन सोसायटी पार्किगमध्ये संतोष मोरे यांनी कार पार्क केल्याचे रागातून त्यांचे कारला खेटून आरोपी याने त्याची कार उभी केली.आरोपी याचे घरी जावून त्याला कार काढण्याची विनंती केली असता त्याने फिर्यादी यांना तसेच बिल्डींग खाली येवून तेथे उभे असलेले फिर्यादी यांचे भावोजी संतोष मोरे यांना शिवीगाळी करुन हाताबुक्यांनी मारहाण तसेच त्याचे हातामध्ये असलेली चावीने संतोष मोरे यांचे नाकाजवळ व डोक्यात मारून दुखापत केली. याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार संतोष रूपनवर करीत आहेत.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विक्रमाबद्दल खोपोलीमध्ये मंदिरात महाआरती



**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात १० जून २०२६ हा दिवस ऐतिहासिक ठरला आहे. सलग सर्वाधिक काळ लोकशाही पद्धतीने निवडून आलेले पंतप्रधान मोदीनी नवा विक्रम प्रस्थापित केला आहे ,भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचा तब्बल सहा दशकाहून अधिक काळ टिकून असलेला विक्रम मागे टाकला आहे .

मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा देशाच्या पंतप्रधान पदाची धुरा सांभाळत अनेक ऐतिहासिक विक्रम आपल्या नावावर केले आहेत या पार्श्वभूमीवर खोपोली शहरातील बाजारपेठेतील विठ्ठल मंदिरात हिंदू संघटनातर्फे महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, भाजप शहराध्यक्ष अजय इंगुलकर, सरचिटणीस विनायक माडपे, विकास खरपुडे,भाजपा नगरसेविका अश्विनी अत्रे, सानिया शेख, नगरसेवक किशोर पाटील, गोरक्ष समितीचे ॲड रोहित कुलकर्णी, दिलीप पवार, सुनिता महर्षी,युवा नेते संजय तना, अजया जाखोटिया, संजय करंजकर, रा स्व संघाचे उपेंद्र कर्मकर, यासहाअनेक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दीर्घायुष्य लाभो यासाठी देवाकडे प्रार्थना करण्यात आली.


### पेण नगर परिषद, पेण
### जिल्हा–रायगड

#### जाहीर निविदा सूचना २०२६-२७

पेण नगरपरिषदेच्या विविध विभागाकडील कामांकरिता भांडार विभागाकडून पुढील कामाकरिता १) पेण नगरपरिषद पुर्व प्राथमिक शाळा (बालवाडी) शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश कपडयासहित शिलाई करुन पुरविणे. २) व्हिडीओ शुटींग करुन सिडी बनविणे व फोटोग्राफी करणे बाबत. ३) आरोग्य विभागा साठी इंजायली किटा पुरविणे बाबत. हया कामांकरिता योग्य त्या अनुभवी व इच्छुक पुरवठादार/ठेकेदार यांचे व्दिनोंद सिलबंद लिफाफा पध्दतीने जाहीर निविदा सूचना प्रसिध्द करणेंत येत आहे. पेण नगरपरिषद, भांडार विभागात निविदा फॉर्म विक्री कार्यालयीन वेळेत दि. १२/०६/२०२६ ते दि. २२/०६/२०२६ स.११ ते सायं. ५.०० वाजेपर्यंत स्विकारल्या जातील. सदर कामाच्या अटी – शर्ती व कामासंबंधी अतिरिक्त माहिती नगरपरिषद भांडार विभागात कार्यालयीन वेळेत (सुटटीचे दिवस खेरीज) मिळेल.

**सही /–**
**(जीवन पाटील)**
**मुख्याधिकारी**
**पेण नगरपरिषद, पेण**

**जा.क्रं.पेनप/का.७/भांडार/नि.प्र./२०२६–२७/**
**दिनांक :– ११ /०६/२०२६**



### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १८/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... महाड औद्योगिक क्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या खराब झालेल्या ४०० मि.मी. व्यासाच्या आणि ६३० मि.मी. व्यासाच्या एचडीपीई लो सीओडी कलेक्शन पाईपलाईनची दुरुस्ती आणि पुनर्संरेखन करणे. | ₹ ३९,९९,९९५.०० |
| २ | विळे भागाड (ग्रोथ सेंटर) औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... विळे भागाड येथील स्लुईस व्हॉल्व्ह आणि एअर व्हॉल्व्हची दुरुस्ती करणे. | ₹ ३८,७०,९६७.०० |
| ३ | पेण अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... शुद्धजल उदंचन केंद्रातील पंप सेटसाठी उपकरण जोडणीची कामे करणे. | ₹ ३९,१३,०८०.०० |
| ४ | विळे भागाड (ग्रोथ सेंटर) औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती.... विळे भागाड येथील साजे जॅकवेल पोहोच रस्त्याचे पुनर्पृष्ठीकरण करणे. | ₹ ४०,३८,२११.०० |
| ५ | महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... महाड औद्योगिक क्षेत्रातील एसटीपी प्लॉटपासून सीईटीपीपर्यंतच्या निवासी पंपिंग लाईनवरील ३५५ मि.मी. व्यासाच्या एचडीपीई पाईपच्या खराब झालेल्या भागाची दुरुस्ती करणे. | ₹ २२,२३,४२०.०० |
| ६ | पाताळगंगा येथील अग्निशमन केंद्राची देखभाल व दुरुस्ती...... पाताळगंगा अग्निशमन केंद्राला डीजी सेट व सबमर्सिबल पंप व त्यासंबंधित साहित्याचा पुरवठा करणे. | ₹ ३९,६९,२५२.०० |
| ७ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती... रोहा शहरा जवळ बायपास रोडवर आरसीसी बिल्ट-अप कल्व्हर्ट क्रमांक ३ उपलब्ध करून देणे. | ₹ ३५,३०,७३९.०० |
| ८ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती ... तळोजा औद्योगिक क्षेत्रातील जुन्या व नवीन रासायनिक क्षेत्रातील पथदिव्यांच्या प्रकाशयोजनेत सुधारणा करणे. | ₹ ३९,९५,१४५.०० |
| ९ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... सावित्री धरणाच्या वरच्या बाजूच्या भिंतीची पाण्याखालील पाहणी, व्हिडिओग्राफी, पाण्याखालील इपॉक्सी ग्राउटिंग व सिमेंटयुक्त सामग्रीचा वापर करणे. | ₹ ९,८०,९६५.०० |
| १० | रोहा औद्योगिक क्षेत्रामधील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती....... रोहा औद्योगिक क्षेत्रातील 'ए' रस्त्याजवळ नाल्याच्या काठाच्या संरक्षणासाठी गॅबियन भिंतीचे बांधकाम करणे. | ₹ ३९,७५,५९३.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक १५/०६/२०२६ ते दिनांक २९/०६/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १९/०६/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २३/०६/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# विजेच्या मागणीत ८० टक्क्यांनी वाढ

## उन्हाळा बैठकीत महावितरणकडून माहिती

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून शहरातील अनेक भागांमध्ये वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. यामागे वाढलेली विजेची मागणी हे प्रमुख कारण असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. उष्णतेची लाट, वाढलेली आर्द्रता आणि त्यातून वाढलेला वीज वापर यामुळे शहरातील विजेची मागणी तब्बल ८० टक्क्यांनी वाढली असून वितरण यंत्रणेवर क्षमतेपेक्षा अधिक पातळीवर कामकाज सुरू आहे. वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये वनमंत्री तथा ऐरोलीचे आमदार गणेश नाईक यांच्या उपस्थितीत बुधवारी आयोजित बैठकीत महावितरणच्या अधिकाऱ्यांनी



शहरातील वीजपुरवठ्याचा आढावा घेतला.

यावेळी गेल्या १० ते १५ दिवसांपासून वाढलेल्या तक्रारींची कारणे आणि त्यावरील उपाययोजनांची माहिती देण्यात आली. महावितरणचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील यांनी बैठकीत दिलेल्या माहितीनुसार नवी मुंबईतील सुमारे ९५ टक्के वीज वितरण जाळे भूमिगत स्वरूपाचे आहे. उच्च दाबाच्या वाहिन्या आणि प्रमुख फीडरमध्ये कोणतीही मोठी अडचण नसली तरी कमी दाबाच्या एलबी केबल नेटवर्कमध्ये वाढलेल्या भारामुळे बिघाड वाढले आहेत. उष्णता आणि आर्द्रतेमुळे वातानुकूलित यंत्रणा, पाण्याचे पंप, रेफ्रिजरेटर आणि अन्य विद्युत उपकरणांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे नेहमीच्या तुलनेत विजेचा भार सुमारे ८० टक्क्यांनी वाढल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. गेल्या दोन आठवड्यांत उरण, कोपरखैरणे, घणसोली, रबाळे तसेच पनवेल परिसरात एलबी केबल फॉल्टच्या अनेक घटना घडल्या आहेत.

भूमिगत केबलमध्ये दोष निर्माण झाल्यानंतर त्याचे अचूक ठिकाण शोधणे, उत्खनन करणे आणि दुरुस्ती करणे ही वेळखाऊ प्रक्रिया असते. अनेकदा केबलमधील जॉइंटमध्ये गळती किंवा तांत्रिक बिघाड निर्माण झाल्याने पुरवठा विस्कळीत होतो. दोषग्रस्त ठिकाण शोधून दुरुस्ती करण्यासाठी साधारण दोन ते तीन तासांचा कालावधी लागत असल्याचे महावितरणने स्पष्ट केले.वाढलेल्या मागणीमुळे केबल्सच्या उपलब्धतेतही प्रश्न निर्माण झाला होता. त्यासाठी राज्य पातळीवर पाठपुरावा करण्यात आला असून अतिरिक्त केबल्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

सध्या सुमारे १० किलोमीटर लांबीच्या नवीन केबल्स उपलब्ध झाल्या असून वारंवार समस्या निर्माण होणाऱ्या भागांमध्ये त्या टप्प्याटप्प्याने टाकण्यात येत आहेत. तक्रारींवर जलद प्रतिसाद देण्यासाठी काही भागांमध्ये स्वतंत्र संपर्क क्रमांक आणि तक्रार निवारण कक्ष सुरू करण्यात येत आहेत. अतिरिक्त मनुष्यबळ, क्रेनसह पथके आणि यंत्रसामग्री तैनात करून दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर सुरू असल्याचा दावा महावितरणने केला आहे.

# नवी मुंबई मेट्रोचा विमानतळापर्यंत विस्तार

## ५,५७५ कोटींच्या प्रकल्पाला शासनाची मंजुरी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेला गती देणारा महत्त्वपूर्ण निर्णय घेत शासनाने सिडकोच्या मेट्रो विस्तार प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. याअंतर्गत मेट्रो लाईन १ ए आणि लाईन २ विकसित होणार असून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला थेट मेट्रो जोडणी मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत या प्रकल्पास मान्यता देण्यात आली.

मुंबई महानगर प्रदेशासाठी तयार केलेल्या सर्वसमावेशक वाहतूक अभ्यास २०२१ अहवालांतर्गत हा विस्तार प्रस्तावित आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये नवी मुंबई मेट्रो लाईन १ सुरू झाल्यानंतर सिडकोने पुढील टप्प्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल शासनाकडे सादर केला होता. प्रस्तावित मेट्रो लाईन १ ए हा ३.०२ किमी लांबीचा उन्नत मार्ग असून तो सीबीडी बेलापूर ते सागर संगमदरम्यान दोन स्थानकांसह विकसित करण्यात येणार आहे. या मार्गाला प्रस्तावित गोल्ड लाईन मेट्रो लाईन ८शी आंतरजोडणी देण्यात येणार असून त्यामुळे नवी मुंबईच्या पश्चिम भागातून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत अखंड प्रवास शक्य होणार आहे तसेच १४.०७ किमी लांबीची मेट्रो लाईन २ ही पेंधर ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल-४ दरम्यान ११ स्थानकांसह विकसित करण्यात येणार आहे.

हा मार्ग विमानतळ परिसरातील वेगाने विकसित होत असलेल्या क्षेत्रांना तसेच एमआयडीसी भागाला महत्त्वपूर्ण सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध करून देईल. याशिवाय, एमएमआरडीएतर्फे विकसित करण्यात येत असलेल्या कल्याण-तळोजा मेट्रो लाईन १२ शी तळोजा येथील अमनदूत स्थानकावर आंतरजोडणी प्रस्तावित असून, त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशाच्या पूर्वेकडील भागांनाही या मेट्रो नेटवर्कचा लाभ मिळणार आहे.कार्यक्षमता वाढविणे आणि प्रवाशांना अखंड प्रवासाचा अनुभव देणे या उद्देशाने मेट्रो लाईन १ ए आणि लाईन २ यांचे विद्यमान ११ किमी लांबीच्या नवी मुंबई मेट्रो लाईन १ सोबत एकत्रीकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे सागर संगम ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा सुमारे २८ किमी लांबीचा सलग आणि एकात्मिक मेट्रो मार्ग तयार होणार आहे.नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित झाल्यानंतर वाढत्या प्रवासी संख्येच्या पार्श्वभूमीवर या प्रकल्पाचे महत्त्व अधिक वाढले आहे.




**नवी मुंबई मेट्रो लाईन १ ए आणि लाईन २ला मिळालेली मंजुरी ही नवी मुंबईसाठी जागतिक दर्जाची, एकात्मिक आणि शाश्वत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभारण्याच्या सिडकोच्या दृष्टिकोनातील महत्त्वाचा टप्पा आहे. प्रस्तावित एकात्मिक मेट्रो मार्गामुळे निवासी, व्यावसायिक, औद्योगिक तसेच विमानतळ परिसर यांच्यातील संपर्क अधिक सक्षम होईल. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला थेट मेट्रो जोडणी आणि इतर मेट्रो मार्गांशी होणारी आंतरजोडणी यामुळे या प्रकल्पाची उपयुक्तता अधिक वाढणार आहे. हा प्रकल्प आर्थिक विकासाला चालना देण्याबरोबरच प्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ करेल आणि नवी मुंबईला भविष्याभिमुख जागतिक शहर म्हणून अधिक सक्षम बनवेल.**

**-विजय सिंघल**, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

एकात्मिक मेट्रो मार्गामुळे नवी मुंबईला प्रभावी मेट्रो सुविधा उपलब्ध होणार असून कल्याण, तळोजा व आसपासच्या भागांतील नागरिकांनाही विमानतळापर्यंत जलद संपर्क मिळेल. ५,५७५ कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पाचे बांधकाम आर्थिक वर्ष २०२७-२८मध्ये सुरू होण्याची अपेक्षा असून आर्थिक वर्ष २०३१-३२पर्यंत प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होण्याचे नियोजन आहे.

# माथाडी मंडळ आस्थापन पदभरतीकरिता उमेदवारांना परीक्षा शुल्क भरण्यास मुदतवाढ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

माथाडी मंडळ आस्थापनेवरील पदभरतीकरिता उमेदवारांना परीक्षा शुल्क भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. महाराष्ट्र खासगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ कलम ६ अन्वये स्थापित विविध सुरक्षा रक्षक मंडळे व महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ कलम ६ अन्वये स्थापित विविध माथाडी मंडळे यांचे आस्थापनेवरील सेवाप्रवेश नियम शासन परिपत्रक क्र.युडब्लूए-२०१६/प्र.क्र.०१/कामगार-५, दिनांक ११ फेब्रुवारी, २०२१ नुसार खालील संवर्गातील एकूण २२ माथाडी मंडळे व १२ सुरक्षा रक्षक मंडळांतर्गत निरीक्षक, लेखापाल आणि लघुटंकलेखक संवर्गातील पदांच्या सरळसेवा पद्धतीने गट-क मधील रिक्त पदे भरती जाहिरात १३ मे रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

उमेदवारांचे अर्ज ११ जूनला ११.५५ वाजेपर्यंत यशस्वीपणे दाखल झाले असतील अशा उमेदवारांना अर्जाचे परीक्षा शुल्क भरण्याकरिता १२ जूनला ११.५५ वाजेपर्यंत वेळ देण्यात आली होती, तथापि शुल्क भरण्याकरिता तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे शुल्क भरण्याच्या कालावधीत १८ जून ११.५५ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. ही मुदतवाढ ११ जूनपर्यंत अर्ज भरण्यात आलेल्या उमेदवारांना केवळ शुल्क भरण्याकरिता देण्यात येत आहे.

# तुर्भे एमआयडीसीत गांजा अड्ड्यावर छापा

## तडीपार आरोपीच्या पत्नीसह पाच जणांना अटक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

तुर्भे एमआयडीसी अंतर्गत येणाऱ्या इंदिरानगर परिसरात सुरू असलेल्या गांजा विक्रीच्या अड्ड्यावर अमली पदार्थविरोधी पथकाने छापा टाकून एक किलो १४० ग्रॅम गांजा जप्त केला आहे. या कारवाईत तडीपार आरोपी राहुल दांडगे याच्या पत्नीसह पाच जणांना अटक करण्यात आली असून मुख्य आरोपी राहुल दांडगे फरार आहे.



पोलिसांना इंदिरानगर परिसरात गांजाची खुलेआम विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार अमली पदार्थविरोधी पथकाने परिसरात सापळा रचून धडक कारवाई केली. छाप्यामध्ये दीपिका दांडगे हिच्यासह आणखी चार जणांना ताब्यात घेण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या गांजाची अंदाजित किंमत सुमारे १.१४ लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, तपासादरम्यान अटक करण्यात आलेले सर्वजण परस्पर नातेवाईक असल्याचे समोर आले असून गांजा विक्रीच्या व्यवहारात त्यांचा सहभाग असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार मानला जाणारा राहुल दांडगे याच्यावर यापूर्वीच तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे. सध्या तो फरार असून त्याचा शोध सुरू आहे. अटक केलेल्या आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबतचा पुढील तपास तुर्भे पोलीस करीत आहेत.

# 'स्काडा'द्वारे पाणीचोरीची ठिकाणे शोधा

## वनमंत्री गणेश नाईक यांचे मनपा प्रशासनाला निर्देश

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मोरबे धरणाच्या जलवाहिनीवरील वाढती पाणीचोरी रोखण्यासाठी विशेष मोहीम राबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच बारवी धरणातून नवी मुंबईला मंजूर असलेला २५ एमएलडी अतिरिक्त पाणीसाठा लवकरात लवकर मिळवण्यासाठी पाठपुरावा वाढवावा, असे निर्देश वनमंत्री गणेश नाईक यांनी महापालिका प्रशासनाला दिले. शहरातील पाणीपुरवठा आणि वीज समस्यांबाबत बुधवारी वाशी येथील सिडको प्रदर्शन केंद्रात झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी हे आदेश दिले.

शहरातील विविध भागांत पाणीपुरवठ्याबाबत वाढलेल्या तक्रारी, कमी दाबाने होणारा पुरवठा आणि वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेला ताण यावर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मोरबे धरणाच्या जलवाहिनीवर मोठ्या प्रमाणात पाणीचोरी होत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. या प्रकारामुळे शहरातील काही भागांना



नियोजित प्रमाणात पाणी उपलब्ध होत नसल्याची बाबही बैठकीत मांडण्यात आली.

याची गंभीर दखल घेत नाईक यांनी स्काडा प्रणालीच्या माध्यमातून जलवाहिनीवरील पाण्याच्या प्रवाहावर लक्ष ठेवून पाणीचोरीची ठिकाणे शोधून काढण्याच्या सूचना दिल्या. जलवाहिन्यांची नियमित तपासणी, संशयित जोडण्यांवर कारवाई आणि वितरण व्यवस्थेतील गळती रोखण्यासाठी विशेष लक्ष देण्याचे आदेश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. पाणीपुरवठा व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी महापालिकेने स्वतंत्र कृती आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत बारवी धरणातून नवी मुंबईला मंजूर असलेल्या २५ एमएलडी अतिरिक्त पाण्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. हा पाणीसाठा अद्याप शहराला मिळाला नसल्याने वाढत्या मागणीच्या तुलनेत उपलब्ध पाण्यावर ताण निर्माण होत असल्याचे सांगण्यात आले. संबंधित विभागांशी समन्वय साधून हा हिस्सा लवकर उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्याचे निर्देश नाईक यांनी दिले.

पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी पाणीचोरी रोखणे व अतिरिक्त जलस्रोत उपलब्ध करणे या बाबींवर विशेष भर देण्यात आला. बैठकीला महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, सभागृह नेते सागर नाईक, आयुक्त डॉ. कैलास शिंदे, महावितरणचे डी. आर. पाटील यांसह वरिष्ठ अधिकारी, पदाधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

### स्काडा प्रणाली म्हणजे काय?

पाणीपुरवठा व्यवस्थेवर डिजिटल पद्धतीने देखरेख ठेवण्यासाठी वापरण्यात येणारी स्काडा (Supervisory Control and Data Acquisition) ही प्रणाली जलवाहिन्यांमधील पाण्याचा प्रवाह, दाब, जलसाठ्याची पातळी आणि वितरणाची स्थिती यांची रिअल टाइम माहिती उपलब्ध करून देते. एखाद्या भागात अचानक पाण्याचा दाब कमी होणे, गळती होणे किंवा अनधिकृत पाणी उपसा होत असल्यास त्याचे संकेत या प्रणालीतून मिळू शकतात. त्यामुळे पाणीचोरी आणि गळती शोधण्यासाठी ही प्रणाली प्रभावी मानली जाते.

# वीजकोंडीवरून उपमहापौर भगत यांनी घेतली अधिकाऱ्यांची बैठक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

एप्रिल-मे महिन्यात नेहमीच विजेची मागणी वाढते. यंदाचा उन्हाळा असह्य झाला असून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक वैतागले आहेत. महावितरणच्या कारभाराबाबत उपमहापौर दशरथ भगत यांनी पुढाकार घेऊन वीज वितरण अधिकारी व सानपाडा विभागातील ग्राहकांची संयुक्त बैठक सोमवारी (दि. ८) सायंकाळी सानपाडा गाव येथे घेतली.

या बैठकीला नगरसेविका शिल्पा राजेश ठाकूर, माजी नगरसेविका सुनंदा पाटील,



समाजसेवक जगदीश पाटील, भालचंद्र पाटील, राजेश ठाकूर, दत्त मंदिर ट्रस्ट अध्यक्ष सदानंद पाटील, युवा समाजसेवक अर्जुन नाईक, ग्रामस्थ व प्रभागातील महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीचे यशस्वी आयोजन प्रभाग १९ नगरसेविका व 'क' प्रभाग सभापती शैला पाटील यांनी केले होते. सदर बैठकीत नागरिकांना सुरळीत वीजपुरवठा करण्यात यावा, दुरवस्थेत असलेल्या केबल्स दुरुस्त कराव्यात किंवा बदलाव्यात, वीज खंडित झाल्यास पुरवठा पूर्ववत करण्यासाठी योग्य साधनसामग्री व मनुष्यबळ उपलब्ध असावे. सानपाडा गावातील व परिसरातील डीपी, सबस्टेशन्स यांची दुरुस्ती करण्यात यावी, असे निर्देश उपमहापौर भगत यांनी दिले.

# बेलापूरचा किल्ला : नवी मुंबईच्या इतिहासाची अनोखी पाऊलखूण


नवी मुंबई म्हणजे फक्त उंच इमारती आणि सिमेंटचे रस्ते नाहीत. या शहराच्या पोटात इतिहासाच्या काही खुणा आजही शांतपणे उभ्या आहेत. त्यापैकीच एक म्हणजे बेलापूरचा किल्ला. पाम बीच रोडवरून जाताना खाडी किनारी उभा असलेला हा छोटेखानी किल्ला अनेकदा नजरेतून सुटतो. पण एकदा आत गेलात की ४०० वर्षांचा इतिहास तुमच्याशी बोलू लागतो. १५६० ते १५७० च्या दरम्यान सिद्धींनी हा किल्ला बांधला. त्याचा मुख्य उद्देश होता पनवेल खाडीवरून होणाऱ्या व्यापारावर नजर ठेवणे. पुढे १६८२ मध्ये पोर्तुगीजांनी हा किल्ला ताब्यात घेतला. १७३३ मध्ये मराठ्यांच्या वसई मोहिमेदरम्यान चिमाजी अप्पांनी हा किल्ला जिंकला. १८१८ मध्ये इंग्रजांनी मराठ्यांकडून हा किल्ला घेतला आणि त्याला 'बेलापूर फोर्ट' नाव दिले.



किल्ल्याच्या तटबंदीचे अवशेष आजही मजबूत आहेत. आतमध्ये विहीर, कोठारे आणि काही इमारतींचे जोते दिसतात. किल्ल्यावरून समोर पसरलेली पनवेलची खाडी आणि लांबवर दिसणारा थळ घाट नजरेत साठवावा असा आहे. पावसाळ्यात तटबंदीवर हिरवे शेवाळ साचते आणि किल्ल्याला वेगळीच शोभा येते. नवी मुंबई महापालिकेने येथे सुशोभीकरण केले आहे. दिवाबत्तीची सोय, बसण्यासाठी बाके आणि माहिती फलक लावले आहेत. संध्याकाळी अनेक ज्येष्ठ नागरिक आणि प्रेमीयुगुल येथे फिरायला येतात. सीबीडी बेलापूर रेल्वे स्टेशनपासून हा किल्ला अवघ्या १० मिनिटांच्या अंतरावर आहे. त्यामुळे ऑफिस सुटल्यावर अनेक नोकरदार वर्ग थोडा वेळ निवांत घालवण्यासाठी येथे येतात.

किल्ल्याच्या मागच्या बाजूला खाडी किनारी कोळी बांधवांची वस्ती आहे. पहाटे त्यांच्या बोटी मासेमारीसाठी निघतात तेव्हा किल्ल्यावरून दिसणारे ते दृश्य पाहण्यासारखे असते. लहान मुलांना इतिहासाची गोडी लावण्यासाठी शाळेच्या सहली येथे आणल्या जातात. इथे कोणतेही प्रवेश शुल्क नाही. सकाळी ६ ते रात्री ९ पर्यंत किल्ला खुला असतो. रविवारी सकाळी तुम्ही कुटुंबासह येथे या. सोबत घरून डबा आणा. तटबंदीवर बसून खाडीच्या वाऱ्यासोबत नाश्ता करा. शहराच्या मध्यभागी असूनही इथला शांतपणा तुम्हाला नक्की आवडेल.





किल्ल्याच्या पायथ्याशी असलेले गणपती मंदिरही जुने आहे. आपल्या शहराची मुळे कुठे आहेत हे कळण्यासाठी असे किल्ले जपले पाहिजेत.

या किल्ल्यावर उभे राहून एका बाजूला दिसणारी नवी मुंबईची आधुनिक इमारत आणि दुसऱ्या बाजूला दिसणाऱ्या पारंपरिक मासेमारी होड्या हा विरोधाभासच या शहराची खरी ओळख आपणास सांगतो. इथे सेल्फी काढणारी तरुणाई आणि इतिहासाच्या खुणा शोधणारे ज्येष्ठ, दोघेही एकाच वेळी दिसतात. हेच या किल्ल्याचे यश आहे.

# रायगड जिल्ह्यात जूनच्या पहिल्या १० दिवसांत केवळ ३.८ टक्के पाऊस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

१० जूनपर्यंतच्या पर्जन्य अहवालानुसार जिल्ह्यातील सर्व १५ तालुक्यांमध्ये पावसाने अद्याप गती घेतलेली नाही, **रायगड :** रायगड जिल्ह्यात यंदा पावसाची सुरुवात अत्यंत संथ झाली आहे. १० जून पर्यंतच्या पर्जन्य नोंदीनुसार, जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी केवळ ८.४ मिमी पावसाची नोंद झाली असून, हे प्रमाण एकूण सरासरीच्या (२१८.६ मिमी) तुलनेत अवघे ३.८ टक्के इतकेच आहे.गेल्या वर्षी सन २०२५ मध्ये याच कालावधीत जिल्ह्यात तब्बल ७४.२ मिमी (३३.९ टक्के) पाऊस झाला होता, त्याच्या तुलनेत यंदा पावसाचा जोर अत्यंत कमी असल्याचे दिसून येत आहे.



**तालुकावार पावसाची स्थिती**

१० जूनपर्यंतच्या पर्जन्य अहवालानुसार जिल्ह्यातील सर्व १५ तालुक्यांमध्ये पावसाने अद्याप गती घेतलेली नाही. मुरुड, श्रीवर्धन आणि म्हसळा या किनारपट्टीच्या भागात इतर तालुक्यांच्या तुलनेत काहीसा अधिक पाऊस झाला आहे. जिल्ह्यात आतापर्यंत सर्वाधिक २५.७ मिमी पाऊस मुरुड तालुक्यात नोंदवला गेला आहे, जो सामान्य पावसाच्या १२.९ टक्के आहे. म्हसळा तालुक्यात २३.७ मिमी (९.१ टक्के) तर श्रीवर्धन तालुक्यात १८.१ मिमी (७.४ टक्के) पावसाची नोंद झाली आहे.

तळा तालुक्यात १६.१ मिमी (६.४ टक्के) आणि पोलादपूर तालुक्यात ११.७ मिमी (४.८ टक्के) प्रगतीशील एकूण पाऊस झाला आहे. महाडमध्ये ११.६ मिमी (५.१ टक्के) तर रोहा तालुक्यात ९.१ मिमी (३.९ टक्के) पाऊस पडला आहे. जिल्हा मुख्यालय असलेल्या अलिबाग तालुक्यात ६.४ मिमी (३.४ टक्के) आणि माणगाव तालुक्यात ८.३ मिमी (३.७ टक्के) नोंद झाली आहे.

पनवेल तालुक्यात आतापर्यंत सर्वात कमी म्हणजे अवघा १.२ मिमी (०.७ टक्के) पाऊस झाला आहे. याशिवाय कर्जत (२.९ मिमी), खालापूर (५.३ मिमी), उरण (५.८ मिमी), सुधागड (३.८ मिमी) आणि पेण (२.० मिमी) या तालुक्यांमध्येही पावसाची टक्केवारी तीन टक्क्यांच्या आतच आहे.

गेल्या वर्षी जूनच्या पहिल्या १० दिवसांत अलिबाग (११२.९ मिमी), उरण (१०४.७ मिमी), रोहा (११२.५ मिमी) आणि तळा (१०६.३ मिमी) या भागांत चांगला पाऊस झाला होता, मात्र यंदा या सर्वच भागांत पावसाने अद्याप म्हणावी तशी हजेरी लावलेली नाही.

एकूणच संपूर्ण कोकण विभागाचा विचार केला तर विभागात आतापर्यंत सरासरी ३९.५ मिमी (१७.९ टक्के) पाऊस झाला आहे, ज्यामध्ये रायगड जिल्ह्याची सरासरी (८.४ मिमी) बरीच खालावलेली आहे.

हवामान विभागाने पुढील काही दिवसांत पावसाचा जोर वाढेल असा अंदाज वर्तवला असला, तरी सध्याच्या संथ सुरुवातीमुळे बळीराजा मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींसाठी कर्जतमध्ये महाआरती

**कर्जत : प्रतिनिधी**

देशाचे प्रधानमंत्री या पदावर विराजमान झाल्यानंतर सलग सर्वाधिक काळ पंतप्रधान राहण्याचा मान मिळाला आहे. याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्यासाठी कर्जत येथे भाजप कडून महाआरती करण्यात आली. यावेळी भाजप कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आणि पेढे वाटून आनंद साजरा केला.

देशाचे प्रधानमंत्री म्हणजे सलग बारा वर्षे नरेंद्र मोदी सरकार कार्य करीत आहे. सर्वाधिक दिवस पंतप्रधान राहण्याचा मान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना मिळाला असून याबद्दल कर्जत भाजप मंडलाच्या माध्यमातून जल्लोष साजरा करण्यात आला.पंतप्रधान यांच्या दीर्घायुष्य, उत्तम, आरोग्य, उज्वल, भविष्यासाठी स्थानिक मंदिरात प्रार्थना पूजा अर्चना करून महाआरतीचे आयोजन केले होते.

कर्जत येथील श्री कपालेश्वर मंदिर येथे उत्तर रायगड सरचिटणीस दीपक बेहेरे, उत्तर रायगड या अभियानाचे प्रमुख राजेश भगत, माजी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, उद्योग आघाडी उत्तर रायगड जिल्हा सहसंयोजक भालचंद्र जोशी, उत्तर रायगड कायदा सेल जिल्हा संयोजक ॲड. गायत्री परांजपे, कर्जत शहर मंडल महिला मोर्चा अध्यक्षा. तृषाली मुंडे, कर्जत शहर मंडल उपाध्यक्षा सरस्वती चौधरी, माजी नगराध्यक्ष रजनी गायकवाड, भाजप कर्जत शहर महिला प्रमुख शर्वरी कांबळे, कर्जत शहर मंडल चिटणीस मिनेश मसणे, कर्जत शहर माजी महिला मोर्चा अध्यक्षा स्नेहा गोगटे, भाजपा रेल्वे प्रकोस्ट सहसंयोजक महाराष्ट्र नितीन परमार, कर्जत शहर युवा मोर्चा अध्यक्ष सर्वेश गोगटे, कर्जत शहर सरचिटणीस सूर्यकांत गुप्ता आदी प्रमुख उपस्थित होते.



# माथेरानच्या थंड हवेत 'बत्ती गुल' ; संतप्त नागरिकांची महावितरणवर प्रश्नांची सरबत्ती

**नेरळ : प्रतिनिधी**

राज्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमध्ये यंदा वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांसह पर्यटकांनाही मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. सततच्या वीज खंडित होण्याचा थेट परिणाम पाणीपुरवठा योजनेवर होत असल्याने माथेरानच्या पर्यटन व्यवसायावरही संकटाचे सावट निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय स्थानिक नेते आणि नागरिकांनी बुधवार १० जून रोजी माथेरान महावितरणच्या अधिकाऱ्यांची भेट घेत तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यानंतर हा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, असे आश्वासन अधिकाऱ्यांकडून देण्यात आले.

गेल्या काही महिन्यांपासून माथेरानमध्ये वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. वीज नसल्याने पाणीपुरवठा विस्कळीत होत असून पर्यटन हंगामात हॉटेल व्यावसायिक, व्यापारी आणि पर्यटकांनाही मोठा फटका बसत आहे. परिस्थिती इतकी गंभीर बनली होती की नागरिकांनी वीज वितरण कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला होता.

दरम्यान, कर्जत विभागाचे अभियंता चंद्रकांत केंद्रे यांनी स्थानिक प्रतिनिधीं सोबत बैठक घेत समस्या सोडविण्यासाठी विविध उपाययोजना हाती घेण्यात येत असल्याची माहिती दिली. माथेरान आणि नेरळ परिसरासाठी स्वतंत्र सब-स्टेशन उभारण्याचा प्रस्ताव पुढे सरकत असून सध्या एका पॉईंटवरून होणारा वीजपुरवठा दोन पॉईंटवरून करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय माथेरानसाठी सुमारे २० किलोमीटर नवीन केबल टाकण्यात येणार असल्याने वारंवार उद्भवणाऱ्या केबल नादुरुस्तीच्या समस्येलाही कायमचा आळा बसण्याची शक्यता आहे.



माथेरानमधील कमी दाबाच्या वीजपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी तातडीने चार ते पाच नवीन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून दिले जाणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. तसेच डोंगराळ आणि जंगल परिसरातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन विद्युत वाहिन्यांचे पक्षी व वन्यप्राण्यांपासून संरक्षण करण्यासाठी विशेष आवरणे बसविण्यालाही मंजुरी देण्यात आली आहे. या उपाययोजनांमुळे माथेरानचा दीर्घकाळ प्रलंबित असलेला वीज प्रश्न लवकरच निकाली निघेल, असा विश्वास स्थानिकांनी व्यक्त केला आहे. मात्र प्रत्यक्ष कामे किती वेगाने पूर्ण होतात, याकडे आता माथेरानकरांचे लक्ष लागले आहे.

बैठकीस कर्जत तालुका अभियंता चंद्रकांत केंद्रे, माथेरानचे अभियंता सचिन आटपाटकर, उपनगराध्यक्ष संतोष शेलार, नगरसेवक सिताराम कुंभार, गौरांग वाघेला, प्रवीण सकपाळ, नगरसेविका अर्चना भिलारे, रिजवान शेख, तसेच कुलदीप जाधव, राजेश चौधरी, चंद्रकांत जाधव, राजेश दळवी, योगेश दळवी आणि अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

## पेण तालुका आगरी समाज विकास मंच अध्यक्षपदी ॲड. डी.पी.म्हात्रे

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुका आगरी समाज विकास मंचाची सर्वसाधारण सभा नुकतीच सेवानिवृत्त न्यायाधीश ॲड डी. पी. म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा कडू यांच्या हस्ते गणरायाचे पूजन करून सभेची सुरुवात करण्यात आली. सभेच्या प्रारंभी कृष्णा वर्तक यांनी उपस्थित सभासद व मान्यवरांचे स्वागत केले. त्यानंतर देशातील तसेच समाजातील दिवंगत मान्यवरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली मागील सभेचे इतिवृत्त कार्यवाहक ॲड. संदीप भोईर यांनी वाचन करून सभेसमोर मांडले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.



नवीन कार्यकारी मंडळाच्या निवडीबाबत अभिजीत कडू वासुदेव पाटील, राम म्हात्रे व शशिकांत भगत यांनी आपले विचार मांडले. त्यानंतर नवीन कार्यकारणीची घोषणा करण्यात आली. नवीन कार्यकारिणीत अध्यक्षपदी सेवानिवृत्त न्यायाधीश ॲड डी.पी.म्हात्रे यांची बिनविरोध निवड करण्यात आली तसेच उपाध्यक्षपदी अभिजीत रमेश कडू (नगरसेवक, पेण) व उज्वल यशवंत म्हात्रे, खजिनदारपदी विठोबा बाळाराम पाटील (वाशी), सरचिटणीरत्यदी शशिकांत पुंडलिक भगत, सहचिटणीसपदी राम वामन म्हात्रे यांची निवड करण्यात आली

कार्यकारिणी सदस्य म्हणून ललित रवींद्र पाटील (उद्योजक, पेण), मंगेश भालचंद्र म्हात्रे (उद्योजक, पेण), परशुराम तुकाराम म्हात्रे (डोलवी), कृष्णा धर्माजी म्हात्रे (डोलवी), अनंत शंकर पाटील (जनवली), योगेश काशिनाथ पाटील (वडखळ), कृष्णा महादेव वर्तक (मोठे वढव वासुदेव पोसुराम पाटील (तरणखोप) यांची निवड करण्यात आली, सल्लागार म्हणून तुकाराम जोमा म्हात्रे, विठोबा तुकाराम म्हात्रे, रमेश नारायण पाटील, यशवंत चिंतामण पाटील आणि द्वारकानाथ नारायण वर्तक यांची नियुक्ती करण्यात आली

यावेळी समाज विकासाच्या कार्यासाठी देणगीची घोषणाही करण्यात आली. विठोबा बाळाराम पाटील यांनी ५१ हजार रुपये, तर ह.भ.प. कृष्णा महादेव वर्तक यांनी २५ हजार रुपयांची देणगी जाहीर केली. ज्येष्ठ नागरिक व समाजसेवक बाबुराव कडू यांनी प्रत्येकाले या सामाजिक कार्यासाठी २५ हजार रुपयांची मदत करण्याचे आवाहन केले. आगरी समाज आज आर्थिकदृष्ट्या सक्षम असून अनेक दानशूर व्यक्ती या उपक्रमाला सहकार्य करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उद्योजक ललित पाटील यांनीही आगरी समाजाच्या विकासारराठी कोणतीही कमतरता भासू देणार नसल्याचे सांगितले.

## नवी मुंबई विमानतळ एअरपोर्ट एव्हिएशन एम्प्लॉईज युनियन अध्यक्षपदी आमदार महेंद्र थोरवे

**खोपोली : प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे ऑल इंडिया एअरपोर्ट एव्हिएशन एम्प्लॉईज युनियनच्या विमानतळ शाखेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची घोषणा महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली. यावेळी विमानतळ शाखेच्या अध्यक्षपदी कर्जत खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे या नव्या नेतृत्वाची निवड जाहीर करण्यात आली.

युनियनच्या माध्यमातून विमानतळ कर्मचाऱ्यांचे हक्क, कल्याण आणि संघटनेची बळकटी यासाठी कार्य करण्याचा निर्धार नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. संघटनेच्या जबाबदारीला योग्य न्याय देत कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी व त्यांच्या उज्वल भविष्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचा मानस यावेळी आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडून व्यक्त करण्यात आला.



यावेळी चीफ सेक्रेटरीपदी प्रीतम सुर्वे, जनरल सेक्रेटरीपदी सचिन केनी, जॉईंट सेक्रेटरीपदी हेमंत भोपी, स्वप्निल मोरे, दिलखुश केनी व अमर म्हात्रे, सेक्रेटरीपदी महेंद्र नाईक, ट्रेझररपदी पंकज मुंडकर, जॉईंट ट्रेझररपदी विनोद साबळे तसेच व्हाईस प्रेसिडेंटपदी निलेश गायकवाड, बळीराम पाटील आणि बालाराम नाईक यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत तसेच शिवसेना मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली संघटना अधिक मजबूत करण्यासाठी कार्यरत राहण्याचा संकल्प सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.या कार्यक्रमास ऑल इंडिया एअरपोर्ट एव्हिएशन एम्प्लॉईज युनियनचे मुंबई विभागातील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पशुपालकांनी पशुधनाचे लसीकरण करून घेण्याचे आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पशुधनाला विविध संसर्गजन्य आजारांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने कंबर कसली आहे. राज्यात 'मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम' आता युद्धपातळीवर व मोहीम स्वरूपात सुरू करण्यात आली आहे.



राज्यातील पशुधनाचे आरोग्य राखणे व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणे हे आपले मुख्य ध्येय असून, निश्चित केलेल्या लक्ष्यांकित उद्दिष्टांच्या शंभर टक्के पूर्तीसाठी विभागाने काटेकोर नियोजन केले असून या मोहिमेत सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

पावसाळ्यापूर्वी होणा-या घटसर्प (Haemorrhagic Septicaemia) व फऱ्या (Black Quarter) यांसारख्या घातक आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी लसीची गुणवत्ता टिकून राहणे अत्यंत महत्त्वाचे असते. लसीचा प्रभाव उत्तम राहण्यासाठी शीतसाखळी व्यवस्थापन अत्यंत चोख ठेवण्यात आले आहे. राज्यस्तरापासून ते थेट ग्रामीण भागातील उपकेंद्रांपर्यंत लस पोहोचवताना आवश्यक तापमान राखले जाईल, यासाठी अद्ययावत कोल्ड बॉक्सचा वापर केला जात आहे.

ही मोहीम यशस्वी करण्यासाठी विभागामार्फत सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत जिल्हा व तालुका पातळीवर आवश्यकतेनुसार लसींचा पुरेसा साठा आधीच वितरित करण्यात आला आहे. पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पथके तयार करण्यात आली असून, ती प्रत्यक्ष गावागावांत व गोठ्यांपर्यंत पोहोचून 'डोअर स्टेप' पद्धतीने लस टोचणी करत आहेत. एकाही जनावराचे लसीकरण सुटणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पावसाळ्यात जनावरांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते व संसर्ग पसरण्याचा धोका वाढतो. त्यामुळे ऐनवेळी येणारे संकट आणि होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पशुपालकांनी आपल्या गाई, म्हशी, शेळ्या व मेंढ्यांचे मान्सूनपूर्व लसीकरण करून घ्यावे. यासाठी आपल्या जवळच्या शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही पशुसंवर्धन आयुक्त डॉ.किरण पाटील सांगितले आहे.

**भारत पशुधन प्रणालीवर तत्काळ नोंदणी**

यावेळच्या मोहिमेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे लसीकरणाचे पारदर्शक डिजिटल ट्रॅकिंग होय. आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी सर्व पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या आहेत की, प्रत्येक पशुधनाला लस टोचल्यानंतर त्याची नोंद भारत पशुधन प्रणाली (NDLM Portal) या केंद्र सरकारच्या अधिकृत पोर्टलवर रिअल-टाइम (तत्काळ) करणे आवश्यक आहे. पशुधनाचे टॅगिंग (१२ अंकी बिल्ला) करूनच ही नोंदणी केली जावी, जेणेकरून मोहिमेच्या प्रगतीवर थेट देखरेख ठेवता येईल व बोगस नोंदींना आळा बसेल.

## निगडोली डबल मर्डरची माहिती देणाऱ्यास पोलिसांकडून बक्षीस जाहीर

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील निगडोली येथील वृद्ध दांपत्य रघुनाथ फरात ७३, व सुरेखा फरात ६८.यांच्या दुहेरी निर्गुण हत्येच्य घटनेला पंधरा दिवस उलटून गेले आहेत मात्र खालापूर पोलीस तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला अद्याप या गुन्ह्याचा तपास लावण्यात यश आले नाही, या पार्श्वभूमीवर खालापूर पोलिसांकडून या घटनेसंदर्भात माहिती देणाऱ्यास बक्षीस देण्याचे घोषित केले आहे.

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील निगडोळी गावात रघुनाथ फराट हे सेवानिवृत्त झाल्यानंतर पत्नीसह राहत होते खालापूर पोलीस व स्थानिक गुन्हे शाखा यांनी या घटने संदर्भात पाच ते सहा पथके तयार करून विविध मार्गाने या घटनेचा तपास करीत आहेत या प्रकरणाचा तपास सुरू असताना आरोपी बाबत अथवा गुन्ह्याशी संबंधित महत्त्वाची माहिती नागरिकांनी द्यावी. असे आवाहन खालापूर पोलिसांनी केले आहे. माहिती देणाऱ्यास योग्य ते रोख बक्षीस देण्यात येणार असून त्यांचे नाव पूर्णपणे गुपित ठेवण्यात येईल असे पोलिसांकडून जाहीर करण्यात आले आहे.

# आजपासून महिला टी-२०चा महाकुंभ

## यजमान इंग्लंड आणि श्रीलंकेत सलामीची लढत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाच्या यजमानपदाखाली यंदाच्या आयसीसी महिला टी-२० वर्ल्डकपच्या दहाव्या हंगामाची सुरुवात शुक्रवार (दि.१२)पासून होत आहे. स्पर्धेत पहिल्यांदाच १२ संघ सहभागी होणार आहेत. स्पर्धेतील पहिला सामना यजमान इंग्लंड आणि श्रीलंका या दोन संघांमध्ये खेळवला जाणार आहे.

या स्पर्धेतील पहिला सामना १२ जूनला इंग्लंड आणि श्रीलंका संघांमध्ये होणार आहे. हा सामना भारतात रात्री ११ वाजता सुरू होईल. भारत आणि इंग्लंडच्या वेळेत चार तास ३० मिनिटांचा फरक आहे. स्पर्धेत शनिवारी एका दिवशी तीन सामने खेळवले जाणार आहेत. यातील पहिला सामना स्कॉटलंड आणि आयर्लंड यांच्यात खेळवला जाणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी ३ वाजता सुरू होईल, तर याच दिवशी होणारा दुसरा सामना ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका या संघांमध्ये खेळवला जाणार आहे, जो भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता खेळला जाईल. तर दिवसातील तिसरा सामना न्यूझीलंड आणि वेस्ट इंडिज यांच्यामध्ये भारतीय वेळेनुसार रात्री ११ वाजता सुरू होईल.



### वर्ल्डकपसाठी टीम इंडिया सज्ज

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय संघाने आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेत जेतेपदाचा मान पटकावला होता. भारतात झालेल्या या स्पर्धेत संघाने फायनलमध्ये द. आफ्रिकेला पराभूत करून पहिल्यांदाच वर्ल्डकप जिंकण्याचा मान पटकावला. आता भारतीय संघाकडे पुन्हा एकदा वर्ल्डकप जिंकण्याची संधी आहे. टीम इंडिया छोट्या फॉरमॅटमध्ये मोठा धमाका करून पहिले विजेतेपद उंचावण्यासाठी मैदानात उतरेल.

भारतीय संघाचा या स्पर्धेतील पहिला सामना १४ जूनला पाकिस्तानविरूद्ध होणार आहे. त्यानंतर १७ जूनला भारताचा दुसरा सामना नेदरलँड्स संघाविरूद्ध होणार आहे. तिसरा सामना २१ जूनला दक्षिण आफ्रिकेविरूद्ध होणार आहे, तर २५ जूनला होणाऱ्या सामन्यात भारत आणि बांगलादेश हे दोन्ही संघ भिडणार आहेत. साखळी फेरीतील शेवटच्या सामन्यात भारतीय संघाचा सामना बलाढ्य ऑस्ट्रेलियाविरूद्ध होणार आहे. भारतीय संघाचे सर्व सामने संध्याकाळी ७ वाजता सुरू होणार आहेत.

# नाईट क्लबमधील राडा बेन स्टोक्सला भोवला!



**लंडन : वृत्तसंस्था**

लंडनमधील नाईट क्लबमध्ये रात्रीच्या संचारबंदीचे (कर्फ्यू) उल्लंघन केल्याप्रकरणी इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स आणि गस ॲटकिन्सन यांना न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यातून डच्चू देण्यात आला आहे. या मोठ्या घडामोडीनंतर इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाने (ईसीबी) माजी कर्णधार आणि दिग्गज फलंदाज जो रूट याची हंगामी कर्णधार म्हणून नियुक्ती केली आहे.


लॉर्ड्सवरील पहिल्या कसोटीत न्यूझीलंडवर ११५ धावांनी दणदणीत विजय मिळवल्यानंतर, बेन स्टोक्स आणि गस ॲटकिन्सन यांनी संघाच्या मध्यरात्रीच्या संचारबंदीचे उल्लंघन केले. वृत्तानुसार दोन्ही खेळाडू लंडनच्या एका नाईटक्लबमध्ये उपस्थित होते, जिथे झालेल्या वादानंतर सुरक्षारक्षकाशी त्यांची झटापट झाली. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता ईसीबीने तत्काळ चौकशी सुरू केली आहे आणि चौकशी पूर्ण होईपर्यंत दोन्ही खेळाडूंना निवडीसाठी अनुपलब्ध घोषित केले आहे.

## ॲटकिन्सनसह कसोटी संघातून डच्चू

### जो रूट हंगामी कर्णधार

इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील कसोटी मालिकेतील दुसरा सामना १७ जूनपासून लंडनच्या ओव्हल मैदानावर खेळला जाणार आहे. तिथे जो रूट संघाचे नेतृत्व करेल. कर्णधार स्टोक्स आणि वेगवान गोलंदाज ॲटकिन्सन यांची उणीव भरून काढण्यासाठी बोर्डाने संघात दोन प्रमुख खेळाडूंचा समावेश केला आहे. स्टार वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चर दीर्घ काळानंतर कसोटी क्रिकेटमध्ये परतला आहे. युवा फलंदाज जॉर्डन कॉक्सलाही राखीव खेळाडू म्हणून १५ सदस्यीय संघात स्थान देण्यात आले आहे.

# मानव सुथार काउंटी चॅम्पियनशिपमध्ये खेळणार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यात भारताला ऐतिहासिक विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारा फिरकीपटू मानव सुथार आता काउंटी चॅम्पियनशिपमध्ये खेळताना दिसणार आहे. त्याने इंग्लंडचा प्रसिद्ध काउंटी क्लब वॉरिकशायरसोबत काउंटी चॅम्पियनशिपच्या पुढील दोन सामन्यांसाठी (राउंड) अल्पकालीन करार केला आहे.

२३ वर्षांच्या सुथारने आपल्या पदार्पणाच्याच कसोटी सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करत एकूण सात विकेट्स घेतल्या. यात पहिल्या डावात अवघ्या ३३ धावा देत सहा बळी घेण्याच्या कामगिरीचाही समावेश आहे. त्याच्या या घातक गोलंदाजीच्या जोरावर भारताने अफगाणिस्तानचा एक डाव आणि ३०० धावांनी पराभव करत कसोटी इतिहासातील आपला सर्वात मोठा विजय नोंदवला.

पहिल्याच सामन्यातील या दमदार कामगिरीमुळे मानव सुथारला क्रिकेटची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इंग्लंडमध्ये मोठी संधी मिळाली आहे. वॉरिकशायरच्या यॉर्कशायर आणि सोमरसेटविरुद्ध होणाऱ्या सामन्यांसाठी तो उपलब्ध असेल. भारतासाठी आंतरराष्ट्रीय पदार्पण करण्यापूर्वी त्याने २९ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये १२९ विकेट्स घेतल्या आहेत.

# मेस्सी तंदुरूस्त! मैदानात उतरताच केला गोल

**ऑबर्न : वृत्तसंस्था**

फिफा फुटबॉल वर्ल्ड कप २०२६ च्या सुरुवातीपूर्वी आपल्या शेवटच्या सराव (वॉर्म-अप) सामन्यात अर्जेंटिनाने आइसलँडचा ३-० अशा फरकाने पराभव केला. दुखापतीतून पुनरागमन करणाऱ्या लिओनेल मेस्सीने या सामन्यात मैदानात उतरताच अवघ्या काही सेकंदांत गोल डागला. त्याने संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली तसेच या वर्ल्डकपपूर्वी आपल्या फिटनेसबाबत असलेल्या सर्व शंका दूर केल्या आहेत.

अर्जेंटिना सध्याचा डिफेंडिंग चॅम्पियन (विजेता) संघ आहे. आइसलँडविरुद्धच्या सामन्यापूर्वी संघाचे प्रशिक्षक लिओनेल स्कालोनी यांनी 'प्लेइंग इलेव्हन'मध्ये काही



प्रयोग केले होते. याच कारणामुळे मेस्सीसह अनेक दिग्गज खेळाडूंना सुरुवातीला बेंचवर (राखीव खेळाडू म्हणून) ठेवण्यात आले होते. मेस्सी हा २४ मे रोजी एका क्लब सामन्यानंतर स्नायूंच्या थकव्यामुळे आणि हॅमस्ट्रिंगच्या किरकोळ दुखापतीमुळे एकही सामना खेळला नव्हता. त्यामुळे आगामी स्पर्धेतील त्याच्या तयारीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते.

सामन्याच्या ७०व्या मिनिटाला जेव्हा लिओनेल मेस्सी मैदानात उतरला, तेव्हा प्रेक्षकांचा उत्साह शिगेला पोहचला होता. या ३९ वर्षीय खेळाडूने लगेचच खेळावर आपला प्रभाव पाडला आणि आपल्या अचूक पासेसच्या जोरावर आइसलँडचा बचाव भेदण्यास मदत केली. मेस्सीने मैदानात येताच पेनाल्टी घेत गोल डागला. अर्जेंटिनासाठीचा हा त्याचा ११७वा गोल होता आणि दुखापतीतून परतल्यानंतरचा हा त्याचा पहिलाच गोल ठरला. मेस्सीने संघाची आघाडी २-० अशी केली आणि त्यानंतर तिसऱ्या गोलमध्येही महत्त्वाची भूमिका बजावली.

# अफगाणिस्तानविरुद्ध वनडे मालिकेतून हार्दिक पांड्या बाहेर

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारताचा स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्याला नवीन दुखापतीमुळे अफगाणिस्तानविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतून बाहेर पडावे लागले आहे.

बंगळुरू येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये फिटनेस तपासणीदरम्यान पांड्याच्या मांडीच्या स्नायूला ताण आला. वृत्तानुसार हार्दिकने फिटनेस तपासणीदरम्यान पूर्ण १० षटके गोलंदाजी केली, मात्र या चाचणीदरम्यान त्याच्या मांडीच्या स्नायूला दुखापत झाली. ही दुखापत इतकी गंभीर आहे की, त्याला किमान तीन आठवडे विश्रांती घ्यावी लागेल.

# ऑस्ट्रेलियाने शून्यावर गमावल्या तीन विकेट्स!

## तस्किन-मुस्तफिजूरची भेदक गोलंदाजी

**ढाका : वृत्तसंस्था**

एकेकाळी वनडे क्रिकेटचा बादशाह अशी ओळख निर्माण केलेल्या ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाची सध्याची कामगिरी फारच लाजिरवाणी ठरत आहे. बांगलादेश दौऱ्यावरील सलग दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांवर नामुष्की ओढवली. ढाकामध्ये खेळल्या गेलेल्या दुसऱ्या वनडेमध्ये ऑस्ट्रेलियाने शून्यावर तीन विकेट्स गमावत लाजिरवाणी सुरुवात केली.

सध्या बांगलादेश आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका सुरू आहे. मालिकेतील पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियन संघाला केवळ १९१ धावा करता आल्या. डकवर्थ-लुईस पद्धतीनुसार निकाल जाहीर झाला असला, तरी बांगलादेशने हा सामना ८६ धावांनी सहज जिंकला. दुसऱ्या सामन्यात संघ पुनरागमन करेल अशी आशा होती, परंतु त्यांची स्थिती अधिकच खालावली. संघाचे प्रमुख तीन फलंदाज एकही धाव न काढता बाद झाले.

सलामीवीर मॅथ्यू शॉर्ट चार चेंडूंचा सामना केल्यानंतर खातं न उघडता शून्यावर बाद झाला. तस्किन अहमदने शॉर्टला क्लीन बोल्ड केले. दुसरा सलामीवीर कूपर कॉनॉली गोल्डन डक म्हणजेच पहिल्याच चेंडूवर शून्यावर बाद झाला. मॅट रेनशॉही पाच चेंडू खेळून शून्यावरच बाद झाला. मुस्तफिजूर रहमानने दोन्ही फलंदाजांना झेलबाद केले.

# कसोटी क्रमवारीत हॅरी ब्रूक पुन्हा अव्वल स्थानी


## शुबमन गिल टॉप-१०मध्ये

**दुबई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) कसोटी खेळाडूंची ताजी क्रमवारी जाहीर केली आहे. यामध्ये मोठा फेरबदल झाला आहे. इंग्लंडचा कसोटीतील स्टार फलंदाज जो रूट नंबर १ स्थान गमावले असून त्याचा सहकारी खेळाडू हॅरी ब्रूक पुन्हा एकदा अव्वल स्थानावर विराजमान झाला आहे.

न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटीतील खराब कामगिरीचा फटका जो रूटला सहन करावा लागला. त्याने पहिल्या डावात एक आणि दुसऱ्या डावात केवळ आठ धावा केल्या. दुसरीकडे ब्रूकने अर्धशतकी (५६ धावा) खेळी केली. ब्रूकच्या खात्यात सध्या ८६९ रेटिंग पॉइंट्स आहेत, तर रूट ८५३ पॉइंट्ससह थेट तिसऱ्या स्थानावर घसरला आहे. ऑस्ट्रेलियाचा ट्रॅव्हिस हेड (८५३ पॉइंट्स) आता ब्रूकनंतर दुसऱ्या स्थानावर आला आहे.

भारतीय कर्णधार शुबमन गिल (७४३ पॉइंट्स) हा आठव्या क्रमांकावर



पोहचला आहे. गिलने मुल्लानपूर येथे अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटीत १२६ धावांची दमदार खेळी केली होती. टीम इंडियाचा सलामीवीर यशस्वी जयस्वाल (७३३ पॉइंट्स) एका स्थानाने घसरून नवव्या क्रमांकावर आला आहे.

भारताचा जसप्रीत बुमराह ८७० पॉइंट्ससह जगातील नंबर १ कसोटी गोलंदाज कायम आहे. बुमराह अफगाणिस्तानविरुद्धच्या कसोटीत खेळला नव्हता. ऑस्ट्रेलियाचा मिचेल स्टार्क (८३८ पॉइंट्स) दुसऱ्या स्थानावर आहे, तर ऑलराउंडर्सच्या यादीत भारताचा रवींद्र जडेजा (४४६ पॉइंट्स) नंबर १वर कायम आहे, तोदेखील मुल्लानपूर कसोटीत भारतीय संघाचा नव्हता.

### टी-२०मध्ये टीम इंडिया नंबर १

आयसीसी रँकिंगमध्ये भारतीय संघाने एकदिवसीय आणि टी-२० प्रकारात आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. टीम इंडिया ११८ रेटिंग गुणांसह वनडे क्रमवारीत अव्वल स्थानावर कायम आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत भारताच्या रेटिंगमध्ये एका गुणाची घट झाली असली, तरी संघाला नंबर वन स्थान कायम ठेवण्यात यश आले आहे. न्यूझीलंडचा संघ ११३ रेटिंग गुणांसह दुसऱ्या स्थानावर, तर ऑस्ट्रेलिया १०३ गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे.

# वर्ल्डकपमध्ये खेळाडूंना 'डिजिटल सुरक्षा कवच'

## दुखापतींपासून रोखण्यासाठी स्मार्ट तंत्रज्ञान

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्ड कप २०२६ हा फुटबॉल इतिहासातील आजवरचा सर्वात मोठा आणि तंत्रज्ञानाच्या दृष्टीने सर्वाधिक प्रगत ठरत आहे. यंदा सामन्यांची वाढलेली संख्या, कडक वेळापत्रक आणि वेगवेगळ्या देशांतील प्रवास यामुळे खेळाडूंच्या शरीरावर आणि मानसिकतेवर कमालीचा ताण पडत आहे. याच आव्हानाचा सामना करण्यासाठी यंदा फिफाने अधिकृत 'टेक्नॉलॉजी पार्टनर' लेनोव्हो कंपनीच्या सहकार्याने प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) इन्फ्रास्ट्रक्चर आणि स्मार्ट वेअरेबल्सचे एक अभेद्य 'डिजिटल सुरक्षा कवच' मैदानात उतरवले आहे.

आजकालचे फुटबॉलपटू जर्सीच्या आत जे 'स्मार्ट वेअरेबल्स' (उदा. विशेष प्रकारची



स्मार्ट वेस्ट किंवा जीपीएस ट्रॅकर्स) घालतात, त्यामध्ये हाय-टेक बायोमेट्रिक सेन्सर्स बसवलेले असतात. हे सेन्सर्स थेट लेनोव्होच्या शक्तिशाली एआय-पॉवर्ड ॲनालिटिक्स सिस्टीमशी जोडलेले असतात. जेव्हा एखादा खेळाडू मैदानात वेगाने धावतो, अचानक दिशा बदलतो किंवा उडी मारतो, तेव्हा त्याच्या स्नायूंची हालचाल, हृदयाचे ठोके आणि रक्तातील ऑक्सिजनची पातळी यावर एआय रिअल-टाइममध्ये म्हणजेच त्याच सेकंदाला बारीक लक्ष ठेवते.

स्नायूंवर अतिरिक्त ताण पडल्यास किंवा शरीरात कमालीचा थकवा आल्यास, मानवी डोळ्यांना किंवा अनुभवी प्रशिक्षकांनाही ते लगेच दिसणार नाही, पण एआय ते अचूक पकडते. खेळाडू दुखापतीच्या छायेत पोहचण्यापूर्वीच एआय अल्गोरिदम्स त्याच्या धावण्याच्या शैलीतील आणि शरीराच्या संतुलनातील सूक्ष्म बदल पकडतात आणि टीमच्या मेडिकल स्टाफला 'ॲडव्हान्स अलर्ट' पाठवतात.

यंदाच्या वर्ल्ड कपच्या अधिकृत चेंडूमध्ये विशेष मोशन सेन्सर चिप बसवण्यात आली आहे. खेळाडूची वेअरेबल वेस्ट आणि या 'स्मार्ट बॉल'चा डेटा एकत्र करून एआय हे मोजते की खेळाडूने किती वेगाने आणि प्रभावाने चेंडू लाथडला. यामुळे खेळाडूच्या पायाच्या स्नायूंची अचूक क्षमता मोजली जाते आणि अचानक पायाला पीळ पडण्याचा धोका टाळता येतो.

# रोनाल्डोची वर्ल्डकप स्वप्नपूर्ती यंदा तरी होणार का?



**लिस्बन : वृत्तसंस्था**

फुटबॉलच्या जगात असे क्वचितच एखादे यश शिल्लक असेल जे क्रिस्टियानो रोनाल्डोने मिळवलेले नाही, पण त्याच्या ट्रॉफींच्या संग्रहात अजूनही एका सर्वात मोठ्या सन्मानाची उणीव आहे. तो म्हणजे फिफा विश्वचषक. २०२६चा विश्वचषक हा त्याचा सहावा आणि कदाचित शेवटचा विश्वचषक सहभाग असू शकतो. त्यामुळे त्याची स्वप्नपूर्ती होणार का याकडे चाहत्यांचे लक्ष असेल.

पोर्तुगाल संघ १७ जून रोजी डीआर काँगोविरुद्ध आपल्या विश्वचषकाच्या मोहिमेला सुरुवात करणार आहे.पोर्तुगाल हा नेहमीच प्रतिभावान फुटबॉलपटूंचा संघ राहिला आहे, पण जागतिक स्तरावर तो आपल्या क्षमतेनुसार कामगिरी करू शकलेला नाही. यावेळी या प्रतिभेचे विजेतेपदांमध्ये रूपांतर करण्याची जबाबदारी मुख्य प्रशिक्षक रॉबर्टो मार्टिनेझ यांच्यावर असणार आहे. २०२५मध्ये नेशन्स लीग जिंकल्यानंतर पोर्तुगाल पूर्ण आत्मविश्वासाने विश्वचषकात उतरत आहे. पात्रता फेरीत काही अडचणी असूनही संघाने अंतिम टप्प्यात उल्लेखनीय पुनरागमन करून विश्वचषकात आपले स्थान निश्चित केले.

पोर्तुगालकडे ब्रुनो फर्नांडिस, विटिन्हा आणि जाओ नेवेस यांसारख्या खेळाडूंचा समावेश असलेली एक मजबूत मिडफिल्ड आहे. बर्नार्डो सिल्वा आक्रमणाला संतुलन देईल. कतार विश्वचषकाच्या तुलनेत यावेळी रोनाल्डोची भूमिका अधिक स्पष्ट आहे आणि तो संघाचा मुख्य फॉरवर्ड म्हणून खेळेल. स्पर्धेतून लवकर बाहेर पडण्याच्या जुन्या समस्येवर मात करणे हे पोर्तुगालपुढील सर्वात मोठे आव्हान असेल.

ब्रुनो फर्नांडिसने यावर्षी उत्कृष्ट कामगिरी केली आहे आणि सातत्याने गोल करण्याच्या संधी निर्माण केल्या आहेत. जर त्याच्या सहकाऱ्यांनी त्याला साथ दिली, तर पोर्तुगाल बचाव भेदून पुढे जाऊ शकतो. प्रशिक्षक रॉबर्टो मार्टिनेझ यांच्यावरही मोठी जबाबदारी असेल. बेल्जियमसोबतचा त्यांचा कार्यकाळ अपेक्षेप्रमाणे मानला गेला नाही, पण पोर्तुगालसोबत नेशन्स लीग जिंकल्याने नवीन आशा निर्माण झाल्या आहेत.

# अन्वय द्रविडची भारतीय संघात निवड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बीसीसीआयने नुकतीच भारताच्या १९ वर्षाखालील पुरुष संघाची घोषणा केली आहे. हा संघ श्रीलंकेविरूद्ध मालिका खेळणार आहे. या संघाचे नेतृत्व यशवर्धन सिंह चौहानकडे देण्यात आले असून लक्ष्य रायचंदानी यांची उपकर्णधारपदी निवड झाली आहे. या १५ सदस्यीय संघात भारताचा माजी कर्णधार व प्रशिक्षक राहुल द्रविडचा मुलगा अन्वय याचीदेखील निवड झाली आहे.

अन्वय हा राहुल द्रविडचा हा धाकटा मुलगा आहे. वडिलांप्रमाणेच अन्वयदेखील विकेटकिपर बॅटर आहे. याआधी अन्वयची नोव्हेंबर २०२५मध्ये भारताच्या १९ वर्षाखालील ब संघात निवड झाली होती. आताचा श्रीलंकेविरुद्धचा दौरा ४ ते २३ जुलैपर्यंत असणार आहे.

# वैभव सूर्यवंशीचे अर्धशतक हुकले



**दांबुला : वृत्तसंस्था**

श्रीलंकेत सुरू असलेल्या 'ए' संघ त्रिदेशीय मालिकेत अफगाणिस्तान 'अ' संघाविरुद्ध धुमाकूळ घालणारा भारताचा १५ वर्षीय फलंदाज वैभव सूर्यवंशी अखेर बाद झाला आहे. वैभवने भारताला अत्यंत स्फोटक आणि वादळी सुरुवात करून दिली, मात्र अर्धशतकाच्या अगदी जवळ असताना तो झेलबाद झाला.

वैभवने आपल्या या छोट्या खेळीत अवघ्या २२ चेंडूंमध्ये ४४ धावा कुटल्या. बाद झाल्यानंतर वैभव स्वतः कमालीचा निराश दिसला आणि खेळपट्टीवरच काही काळ अविश्वासाने उभा राहिला. वैभवने या खेळीत नऊ चौकार मारले, परंतु षटकार काही मारू शकला नाही.

सामन्यात अफगाण गोलंदाजांची पिसे काढणारा वैभव अब्दुल्ला अहमदझाईच्या चेंडूवर बाद झाला. अहमदझाईने गोलंदाजी करताना विकेटच्या पाठीमागून एक आखूड टप्प्याचा चेंडू टाकला, जो वेगाने आत आला. वैभवने बॅकफूटवर जाऊन चेंडूला यष्टीरक्षकाच्या दिशेने 'रॅम्प' करण्याचा प्रयत्न केला, मात्र चेंडूचा वेग जास्त असल्याने तो चक्रावला आणि चेंडू बॅटची कड घेऊन थेट अफगाण यष्टीरक्षक इशाक रहिमीच्या हातात विसावला.

वैभव सूर्यवंशी आज मैदानात पूर्णपणे सेट झाला होता आणि टी-२०च्या स्टाईलने धावा कुटत होता. त्याने आपल्या ४४ धावांच्या खेळीत नऊ चौकार ठोकले. त्याचा स्ट्राईक रेट २००.००चा होता. वैभवने प्रभसिमरन सिंगसोबत मिळून भारताच्या धावसंख्येचा पाया मजबूत केला.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com